बातम्या, लेख
व जाहिरातीसाठी
लातूर
समाचार
समर्थनगर धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक १४४ वा | गुरूवार दिनांक १४ ऑगस्ट, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत १.५० ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)
dainiklatursamachar@gmail.com

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकर भोजनासाठी
भेट द्या

## क्राईम न्युज

### मोबाईलची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी व्यंकट अंबादास पांढरे, वय ४३ वर्षे, रा. वडगांव (सि) ता. जि. धाराशिव यांचा अंदाजे १०,००० किंमतीचा रिअलमी कंपनीचा मोबाईल फोन हा दि.११.०८.२०२५ रोजी वडगाव (सि) येथील महादेव मंदीरातुन संशयीत राजु रा. नवले आश्रम शाळा, पेठबीड गांधीनगर ता. जि. बीड यांनी गर्दीचा फायदा घेवून चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-व्यंकट पांढरे यांनी दि.१२.०८.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. फिर्यादी यांनी दिलेल्या माहितीवरुन धाराशिव शहर पोलीसांनी राजु रा. नवले आश्रम शाळा, पेठबीड गांधीनगर ता. जि. बीड यास ताब्यात घेवून त्याचे कडे सदर गुन्ह्या बाबत चौकशी केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली. पुढील तपास सुरु आहे.

### जकेकुरातून मोबाईलची चोरी

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी वसीम जैनुद्दीन शेख, वय ३३ वर्षे, रा. जकेकुर ता. उमरगा जि. धाराशिव यांची अंदाजे ४०,००० किंमतीची मोटरसायकल ही दि.१०.०८.२०२५ रोजी वसीम शेख यांचे राहते घरासमोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली.अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-वसीम शेख यांनी दि.१२.०८.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### जुगार विरोधी कारवाई

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान वाशी पोलीसांनी दि.१२.०८.२०२५ रोजी वाशी पो. ठाणे हद्दीत २ ठिकाणी छापे टाकले. यावेळी आयुब रा. पारगाव ता. वाशी जि. धाराशिव हे महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या शेजारी कल्याण मटका जुगाराचे साहित्य एकुण ३,९०० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले वाशी पो. ठाणेच्या पथकास आढळले. तर रविंद्र रा. वाशी ता. वाशी जि. धाराशिव हे सरमकुंडी फाटा ते सरमकुंडी गावात जाणारो रोडच्या बाजूला पानटपरी मध्ये कल्याण मटका जुगाराचे साहित्य एकुण २,८५० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले वाशी पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम- १२(अ) अन्वये वाशी पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदवले आहेत.

**झाडे लावा!**
**झाडे जगवा!!**
**झाडे तोड रोखा !!!**

## एकदिवशीय पत्रकार कार्यशाळा संपन्न जिल्हा माहिती कार्यालयाचा पुढाकार



धाराशिव (जिमाका)- जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने आयोजित एकदिवशीय पत्रकार कार्यशाळा आज जिल्हा नियोजन समिती सभागृहात संपन्न झाली.या कार्यशाळेत जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी पुरुषोत्तम रुकमे यांनी आणि मराठी भाषा तज्ज्ञ प्रा.दीपक रंगारी यांनी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन केले.

जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी पुरुषोत्तम रुकमे यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारिता याविषयावर मार्गदर्शन केले.ते मार्गदर्शन करताना म्हणाले की,

आज सर्वच क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या तंत्रज्ञानाचा वापर पत्रकारितेत होत आहे.माणूस आणि ए.आय ला बुद्धिमत्ता आहे.आज विविध कंपन्या त्यांच्या उत्पादित वस्तूंची विक्री करण्यासाठी ए.आय चा वापर करत आहेत.गुगल हे ज्या विषयाची आपल्याला माहिती पाहिजे आहे, त्याबाबतची माहिती व लिंक उपलब्ध करून देते. तर चॅट जीपीटी हे विश्लेषण करून माहिती उपलब्ध करून देते.याचा वापर करताना नेमकेपणा महत्वाचा आहे. आज उपलब्ध होत असलेल्या तंत्रज्ञानाचा वापर पत्रकारिता क्षेत्रात करणे महत्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी श्री.रुकमे यांनी राष्ट्रीय आणि प्रादेशिक वृत्तपत्रांमधील सध्याच्या एआय ॲप्सच्या वापराबाबत माहिती दिली.तसेच त्यांनी भाषिणी,गुगल पिन पॉईंट,नोट बुक एल.एम,१२३ अँप याबाबतची देखील माहीती दिली.

मराठी भाषा तज्ज्ञ प्रा.दीपक रंगारी यांनी पत्रकारितेत प्रमाण लेखनाचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले. ते म्हणाले की,समाजात भाषा टिकवून ठेवण्याचे काम पत्रकार करतात.भाषा शिकण्यासाठी वयाचे बंधन नसते.भोलीभाषेने माणसाला समृद्ध केले. भाषा खेड्यापाड्यात आजही जीवंत आहे असे सांगितले.तसेच त्यांनी मराठी प्रमाणभाषेचे नियम,शब्दांचा अर्थ,व्याकरणाचा योग्य वापर,तसेच मराठी भाषेच्या समृद्धीतील साहित्यिकांचे योगदान याबाबत माहिती दिली.क्रियापदे,शब्दयोगी अव्यय, ऱ्हस्व-दीर्घ उच्चार,तत्सम-तद्भव शब्दांचे नियम उदाहरणांसह समजावून सांगितले. पत्रकारांनी शब्दकोश आणि लेखनकोश यांचा वापर करून अचूक लेखन करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.शब्दांचा वाक्यरचनेनुसार आणि संदर्भानुसार होणारा बदलही त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केला.उपस्थित माध्यमांच्या प्रतिनिधींच्या शंकांचे त्यांनी समाधान केले.

दुपारच्या सत्रात प्रारंभी आद्यपत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित पत्रकार बांधवांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार घालून करण्यात आले.

विभागीय माहिति कार्यालयाच्या उपसंपादक रेखा पालवे यांनी पत्रकारांसाठीच्या अधिस्वीकृती नियमावली,आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना आणि शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधी याविषयी विस्तृत माहिती दिली. या कार्यशाळेला विविध पत्रकार संघटनांचे अध्यक्ष,पदाधिकारी आणि पत्रकार बांधव उपस्थित होते.प्रास्ताविक जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे यांनी केले. संचालन व उपस्थितांचे आभार उपसंपादक रेखा पालवे यांनी मानले.कार्यशाळा यशस्वीतेसाठी जिल्हा माहिती कार्यालयाचे वरिष्ठ लिपिक नंदू पवार, आशा बंडगर, कनिष्ठ लिपिक दिलीप वाठोरे, मोहन कोळी व अनिल वाघमारे यांनी परिश्रम घेतले.

## घरफोडीतील आरोपी स्थानिक गुन्हे शाखेने केला गजाआड

धाराशिव (प्रतिनिधी)- दिनांक १२ रोजी माला विषयीचे गुन्हे उघडकीस आणणे अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि कासार व पथक पेट्रोलिंग करत पोस्ट कळंब हद्दीत असताना गुप्त बातमीवरून संशयित दिगंबर रा. आंदोरा ता. कळंब जि. धाराशिव याने कळंब परिसरात चोरी केली असून त्यातील मुद्देमाल घराच्या जवळील शेतात लपवून ठेवला आहे, अशी बातमी मिळाल्यावर त्याला सिताफिने ताब्यात घेऊन त्याचे कडून मुद्देमाल हस्तगत करून त्याचे कडे सदर बाबत चौकशी केली असता त्याने पोस्टे कळंब हद्दीत निखिल एंटरप्राइजेस, कळंब येथे घरफोडी केल्याची कबुली दिली. त्यावरून पोस्टे कळंब गुन्हे अभिलेख पाहिले असता गुरनं २८०/२५ अन्वये घरफोडीचा गुन्हा दाखल असल्याची माहिती प्राप्त झाली. त्यावरून तात्काळ पंचनामा करून नमूद गुन्ह्यातील २,२४,२९८ रुपये किंमतीचे दुकानातून चोरीस गेलेले इलेक्ट्रॉनिक साहित्य आणि २००० मीटर अल्युमिनियम तार असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ताब्यात असलेल्या आरोपीने त्याच्या अन्य साथीदाराच्या मदतीने सदरचे गुन्हा केल्याचे कबुली दिली. नमुद आरोपीस पुढील कार्यवाही कामी पोलीस ठाणे कळंब येथे हजर केले आहे.

सदरची कामगीरी अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना. यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार, सुदर्शन कासार (सपोनि.),पोह शौकत पठाण, प्रकाश औताडे, जावेद काझी, फराहान पठाण, चापोका रत्नदीप डोंगरे, चापोका बाबासाहेब गुरव यांच्या पथकाने केली आहे.

## जिल्हाभरात ड्रग्जविरोधी मोहीम राबविणार जागतिक युवा दिनाच्या निमित्ताने आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचा निर्धार

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- तुळजापूर शहर आणि परिसरातून ड्रग्ज हद्दपार झाला आहे. तुळजापूरात ज्या पद्धतीने काही नागरिकांचे सहकार्य घेऊन हे विष उखडून टाकण्यासाठी पोलीस प्रशासनाच्या मदतीने मोहीम राबविली अगदी तशीच व्यापक मोहीम जागतिक युवा दिनाच्या निमित्ताने जिल्हाभरात युवकांच्या सहकाऱ्यांने राबविण्याचा निर्धार करण्यात आला आहे. पोलिस आणि जिल्हा प्रशासनाला तशा सूचनाही दिल्या आहेत. जिल्ह्यातील युवकांना सजग होऊन ड्रग्जविरोधी मोहिमेत प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.

जागतिक युवा दिनी जगभर युवकांना उध्वस्त करणाऱ्या या विषारी धंद्या विरुद्ध लढा देण्याची जबाबदारी आम नागरिकांनी देखील स्वीकारायला हवी. तुळजापूर शहर आणि परिसरात सुरू असलेला हा प्रकार मुळातून उखडून टाकण्यासाठी आपण नागरिकांना माहिती देण्याचे आवाहन केले होते. मिळालेल्या माहिती पोलीस प्रशासनाला देऊन सूचना दिल्या होत्या. पोलिसांनी संबंधित नागरिकांसह त्यांची यंत्रणा कामाला लावून मोठी कारवाई केली आणि आता तुळजापुरातून हा सगळा धंदा हद्दपार झाला आहे. नागरिकांनी दिलेल्या माहितीमुळे हे सगळे घडून आले. आता जिल्ह्यातील अन्य ठिकाणी सुरू असलेल्या गैरप्रकाराला आळा घालण्यासाठी जिल्हा प्रशासनाला सक्त सूचना दिल्या आहेत.

प्रत्येक महाविद्यालयात अँटी नार्को टिक्स क्लब स्थापन करण्यात येत आहे व त्याची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना सांगण्यात आले आहे व ते लवकरच याचा आढावा घेतील. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसमवेत सजग पालकांनाही सहभागी करून घेण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

जिल्हाभरातील युवक, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांपर्यंत या मोहिमेच्या माध्यमातून अत्यंत संवेदनशील पद्धतीने माहिती पोहचवली जाणार आहे. या विषारी व्यसनाचे दुष्परिणाम किती घातक आणि दीर्घकालीन आहेत याबाबत प्रभावीपणे जाणीव जागृतीही केली जाणार आहे. शिक्षण, साहित्य, नाट्य आणि सांस्कृतिक क्षेत्रातील तज्ञांचे सहकार्य घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे. जागतिक युवा दिनाच्या निमित्ताने जिल्हाभरात पथनाट्य पथकाच्या माध्यमातून ड्रग्जविरोधी मोहिम अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार करण्यात आला आहे.

या विषारी गोरख धंद्याबद्दल ज्यांच्याकडे माहिती उपलब्ध आहे, अशा सजग आणि कर्तव्यदक्ष नागरिकांनी आपल्याकडे अथवा पोलीस प्रशासनाकडे याबाबतची माहिती द्यावी. माहिती देणाऱ्या नागरिकांचे नाव गोपनीय ठेवण्यात येणार आहे. जिल्हा पोलीस अधीक्षकांशी याबाबत सविस्तर बोलणे झालेले आहे. या व्यापक ड्रग्जविरोधी मोहिमेत सहभागी होऊन तक्रार नोंदविण्यासांबधी स्वतंत्र संपर्क क्रमांक पोलिस यंत्रणेकडून उपलब्ध करून दिला जाणार आहे. ही सगळी प्रक्रिया गोपनीय असणार आहे. त्यामुळे निर्धास्तपणे आपल्या जिल्ह्यातून या विषारी धंद्याचे मुळासकट उच्चाटन करण्यासाठी नागरिकांनी न डगमगता या ड्रग्जविरोधी मोहिमेत सहभागी व्हावे असे आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.

## शेतकऱ्यांच्या सोईसाठी परंडा येथे केळी संशोधन केंद्र स्थापन करावे- डॉ. प्रतापसिंह पाटील

धाराशिव(प्रतिनिधी)- केळीच्या विविध जाती लागवडीचे तंत्रज्ञान रोग,किडणीचे व्यवस्थापन,शिक्षण व प्रशिक्षण या दृष्टीने अभ्यास आणी उपाय योजना करण्यासाठी केळी संशोधनाची गरज आहे त्यासाठी परांडा जि. धाराशिव येथे केळी संशोधन केंद्र सुरू करावे अशी मागणी डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कृषिमंत्री यांच्याकडे केली आहे.

धाराशिव जिल्हा हा शेतीप्रधान असून येथे केळीची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. अनुकूल हवामान, सुपीक जमीन आणि मेहनती शेतकरी यामुळे या भागातील केळी उत्पादनाची गुणवत्ता व प्रमाण उल्लेखनीय आहे.परंतु केळी लागवडीत नवीन वाणांची निर्मिती, कीड-रोग नियंत्रण, उत्पादनवाढ व आंतरराष्ट्रीय दर्जाचे निर्यातक्षम उत्पादन याबाबत मार्गदर्शन देणारे स्वतंत्र केळी संशोधन केंद्र येथे उपलब्ध नाही. यामुळे शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, विपणन व्यवस्था आणि रोगनियंत्रणाबाबत वेळेवर व स्थानिक पातळीवर मदत मिळत नाही. त्या अनुषंगाने धाराशिव जिल्ह्यात केळी संशोधन केंद्र तातडीने स्थापन करण्याची मागणी करण्यात येत आहे.

हे केंद्र स्थापन झाल्यास शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी होईल, नफा वाढेल आणि जिल्ह्याची कृषी अर्थव्यवस्था बळकट होईल.

## भारतीय नागरिकांनी राष्ट्रध्वजाचा मान-सन्मान राखलाच पाहिज-प्रा. डॉ. सायबणणा घोडके




मुरूम (सुधीर पंचगल्ले) भारतीय स्वातंत्र्यलढ्यात राष्ट्रध्वजाची कल्पना ही राष्ट्रीय एकात्मता, स्वाभिमान आणि स्वातंत्र्याच्या आकांक्षेचे प्रतीक म्हणून उदयास आली. सन १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धानंतर देशात स्वातंत्र्याची लाट निर्माण झाली. त्या काळात एकसंध राष्ट्रीय ध्वज नव्हता. २२ जुलै १९४७ रोजी संविधानसभेने सध्याचा राष्ट्रध्वज स्वीकारला. या राष्ट्रध्वजाचा प्रत्येक नागरिकांनी मान-सन्मान राखलाच पाहिजे, असे प्रतिपादन राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. सायबण्णा घोडके यांनी केले. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हरघर तिरंगा अभियानांतर्गत बुधवारी (ता. १३) रोजी प्रमुख व्याख्याते म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अशोक सपाटे होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. घोडके म्हणाले की, राष्ट्रध्वजाचे महत्त्व केसरी : साहस, त्याग, निःस्वार्थता, पांढरा : सत्य, शांती, प्रामाणिकपणा, हिरवा : समृद्धी, शेती, प्रगती, अशोक चक्र : न्याय, धर्म, सतत गतीशीलता व प्रगती असून राष्ट्रध्वज हा आपल्या राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक असून तो स्वातंत्र्य, लोकशाही व सार्वभौमत्वाची आठवण करून देत राष्ट्रध्वजाचा पूर्व इतिहास विस्ताराने त्यांनी या वेळी मांडला. अध्यक्षीय समारोपप्रसंगी डॉ. सपाटे यांनी राष्ट्रीय प्रतीके आणि आपल्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास कायम स्मरणात ठेवला पाहिजे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. प्रताप सिंग राजपूत यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अशोक बावगे तर आभार डॉ. रवी आळंगे यांनी मानले. यावेळी विविध शाखेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

## धाराशिव भाजपात संघटनबांधणीला वेग जम्बो जिल्हा कार्यकारिणी जाहीर

धाराशिव (प्रतिनिधी)- - भाजपा आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली धाराशिव जिल्हा भाजपाची जम्बो कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. या प्रक्रियेत माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, संताजी चालुक्य, नेताजी पाटील, सतीश दंडनाईक, यांचे सहकार्य लाभले. नव्या कार्यकारिणीत जिल्हा उपाध्यक्ष, सरचिटणीस,चिटणीस आणि जिल्हा कार्यकारिणी सदस्य अशा विविध पदांवर एकूण ७० पदाधिकाऱ्यांची घोषणा करण्यात आली आहे. गेल्या महिन्यात जिल्ह्यातील १७ मंडळांची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली होती. त्या प्रक्रियेत तब्बल १,०२० पदाधिकाऱ्यांची निवड होऊन पक्षसंघटना गावागावात अधिक मजबूत झाली होती. आता या जिल्हास्तरीय कार्यकारिणीमुळे पक्षाचे काम तालुक्यापासून जिल्हास्तरापर्यंत आले असून भाजपचे काम आणखी गतिमान होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी या प्रसंगी सांगितले की,भाजपाची संघटनबांधणी ही कार्यकर्त्यांच्या सहभागातून घडत आहे. येणाऱ्या ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपालिका निवडणुकांसाठी हीच कार्यकारिणी पक्षाचे भक्कम बळ ठरेल. या नियुक्त्यांमुळे पक्षातील अनुभवी नेते आणि नव्या पिढीतील कार्यकर्ते एकत्र येऊन अधिक प्रभावीपणे पक्षधोरण जनतेपर्यंत पोहोचवतील, असा विश्वास पक्षनेतृत्वाकडून व्यक्त करण्यात आला आहे. या निवडीबद्दल माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी सर्वांचे अभिनंदन केले आहे.

## बी.एस.एन.एल. ऑफीसचे समोरुन मोटारसायकलची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्ग संदीप लक्ष्मण शिंदे, वय ३२ वर्षे, रा. शिंदेवाडी ता. जि. धाराशिव यांची अंदाजे ५०,००० किंमतीची मोटरसायकल ही दि.११.०८.२०२५ रोजी बी.एस. एन.एल. ऑफीसचे समोरुन सांजा रोड धाराशिव येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-संदीप शिंदे यांनी दि.१२.०८.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## विलासरावजींची आठवण विसरणे अशक्य

लोकनेते विलासराव देशमुख आपल्यात नाहीत ही संकल्पना मान्यच होत नाही. त्यांना विसरणे अशक्य आहे, कारण त्यांनी केलेला विकासाकडे पाहुन आठवण होते. तमात लोकांच्यामनात घर करून कायम असणारे लोकनेते विलासराव देशमुख आहेत. ते राज्याचे मुख्यमंत्री असताना लातूरसाठी विकासाचा खास बाजूला ठेवत असत. ज्यावेळी कॅबिनेटची बैठक असत त्यावेळी लातूरसाठी कोणती नवीन योजना जाहिर केली हे आवर्जुन लातूरकर पाहात होते. निश्चित लातूरसाठी काही तरी योजना असत. त्यामुळे लातूरकरांना वेगळाचा आनंद मिळत असत. लातूरमध्ये त्रिस्तरीय उड्डाणपुल असो किंवा रोजगार हमीच्या माध्यमातून रेल्वेची उभारणी असो. त्याच प्रमाणे सीनाकोळेगावचा बंधारा असो, लातूर तालुक्यात अनेक ठिकाणी सिमेंटचे बंधारे बांधून बाराही महिणे पाणी मिळेल अशी व्यवस्था केली. मांजरा पट्ट्यात तर त्यांनी सहकारात क्रांती घडवली आहे. शेतकरी नगदी पिकाच्या मागे लागतो म्हणून अनेक साखर कारखान्याची उभारणी केली. त्यांचे साखर कारखान्यावरील भाषणात ते सतत बोलत, साखर कारखान्याचा सभासद हा मालक आहे. तो बुलेटवर फेटाबांधून आला पाहिजे. सर्वाधिक ऊसाला दर देणारे त्यांनी साखर कारखाने उभा केली आहेत. आजही मांजरा परिवारने अनेक डबघाईला आलेले साखर कारखान्याचे पुर्नजीवन केले आहे. चांगल्याप्रकारे चालवत आहेत. विलासराव देशमुख यांना जनसामान्यातील सामान्य माणुस हा फोन करीत. ते उचलत असेल. ॲटोरिक्षावाला असो किंवा शेतकरी आपल्या आडीआडचणी तो थेट साहेबांना सांगत. आपल्या घरातील व्यक्ती असल्यासारखे सर्वांना वाटत होते. त्यांनी अनेक विकासाच्या योजना मराठवाड्यात आणल्या आहेत. मराठवाड्यात अनेक मुख्यमंत्री झाले मात्र विकास आपल्या मतदार संघात कसा खेचून आणावा याचे कौशल्य विलासराव देशमुख यांच्याकडून शिकले पाहिजे. त्यांचे सारखे लोकप्रतिनिधी प्रत्येक मतदार संघात असते तर राज्याचा विकास मोठ्या प्रमाणात झाला असता. सहकाराच्यामाध्यमातून विकास केवळ पश्चिम महाराष्ट्रातील नेते साधू शकतात हा शिक्का त्यांनी पुसून टाकला. मराठवाड्यातील जनता सहकाराच्यामाध्यमातून विकास साधू शकतो. अधिक ऊसाला दर देऊ शकते हे त्यांनी दाखविले आहे. त्यामुळे सर्वक्षेत्रात त्यांचा ठास उमटविला आहे. आज जे राज्यात सोयाबिन दिसते आहे हे विलासराव देशमुख यांचे देन आहे, कारण सोयाबिनचे बी त्यांनी अमेरिकेतून मागविले. लातूर व धाराशिव जिल्ह्यात याची प्रथम पेरणी केली. आज सोयाबिन हे प्रमुख पिक म्हणून त्याकडे पाहिले जाते. त्याच प्रमाणे पाण्याशिवाय शेती नाही हे ओळखून जेवढे पाण्याचे क्षेत्र मराठवाड्यात वाढविता येईल तेवढा त्यांनी प्रयत्न केला आहे. आज मांजरा पट्ट्यात सर्वाधिक ऊस दिसून येतो. साखर कारखाने मदत करतात. वेळेवर बँकेत खात्यावर रक्कम जमा होते, त्यामुळे शेतकऱ्यास चिंता नाही. डीसीसी बँकेच्यामदतीने अनेक शेतकऱ्यास टॅक्टर देण्यात आले आहे. डीसीसी बँकेच्यामाध्यमातून जिल्ह्यातील सहकारी सोसायट्या आर्थिकदृष्ट्या मजबुत केल्या आहेत. अनेकांना सोसायटी कर्ज वितरीत केले आहे. आपला देशच कृषीप्रधान असल्याने त्यांनी कृषीक्रांती प्रत्यक्षात आवतरली हे मान्यच केले पाहिजे. अनेक विभागीय स्तरावरील कार्यालय लातूरात आणले. वास्तविक सर्वांना योईयुक्त मध्यवर्ती जिल्हा लातूर आहे. त्यामुळे विभागीय कार्यालय लातूरात व्हावे यासाठी मुख्य रस्त्यावर भव्य अशी इमारत उभारली आहे. येथे आगामी काळात विभागीय आयुक्त कार्यालय झाले तर तेथेच होणार आहे. यासाठी मातब्बर नेत्याची प्रयत्नाची गरज आहे. साहेबांचे अधूरे स्वप्न साकार करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. लातूरमधून दक्षिण भारतात सर्व रेल्वे धावाव्यात अशी त्यांची इच्छा होती. त्यांच्या अथक प्रयत्नाने भला मोठा बोगदा फोडून लातूरला रेल्वे आणली. केवळ त्यांच्यामुळे लातूरला रेल्वे आली हे कोठे तरी मान्यच केले पाहिजे. लातूर नवीन रेल्वे आणल्यावर दक्षिण भारतात अनेक रेल्वे चालू होणे अपेक्षित होते मात्र नवीन रेल्वे रुळ टाकल्यावर ते मजबुत होण्यासाठी काही काळ लागतो. असे असल्याने विलंब झाला त्यातच आमचे नेते निघून गेले. आमचे अधूरे स्वप्न राहिले. त्यामुळे आता काँग्रेस पक्षाचे खासदार असल्याने त्यांनी दक्षिणेत जाणाऱ्या रेल्वे गाड्या लातूर येथून जाव्यात असा प्रयत्न करावा. लातूर व हरंगुळ येथे अत्याधुनिक जंक्शन खासदारांनी उभा करण्याचा प्रयत्न करावा. काँग्रेसची सत्ता केंद्रात नसली तरी लातूर हे विलासराव देशमुख यांचे असल्याने कोणीही विकास कामास विरोध करणार नाही. लातूर हा विकासाचा पॅटर्न विलासराव देशमुख यांच्यामुळे आहे हे मान्यच केले पाहिजे. त्यामुळे लोकप्रतिनिधीनी त्यांचे सारखे वागले पाहिजे. अपशय येतच नाही. अपयश ग्रामीण भागात का आले याचे मंथन केले पाहिजे. असो प्रत्येक नेता व कार्यकर्त्यांनी विलासराव देशमुख यांचा एकतरी गुण अंगीकारला पाहिजे. तरच राजकारणात यशस्वी होतोच. आज प्रत्येकाच्या हृदयात विलासराव वसलेले आहेत कारण त्यांनी पित्याप्रमाणे व पुत्राप्रमाणे हृदयात घर केले आहे ते कायम! त्यामुळे ते आपल्यात नाहीत ही संकल्पना मान्यच होत नाही. अल्पावधित त्यांनी राज्याचा विकास अनेकांच्या डोळ्यात भरणारा केला आहे. विकासाची दुरदृष्टी असावी लागते. आज काँग्रेसची जी उतरती कळा लागली आहे ती कदापी लागली नसती जर ते आज आपल्यात ह्यात असते तर! त्यामुळे विलासराव देशमुख सर्वांचे प्रिय व्यक्ती होते. आज त्याच्या रूपात इतरांना पाहातो. परंतु तशी सर येत नाही. कारण काय आहे हेही कळून येत नाही. त्यामुळे प्रत्येकांनी त्यांचे विचार व जनतेविषयक आपुलकी राखली पाहिजे. जो पर्यंत सुर्य-चंद्र असेल तो पर्यंत विलासरावजींना विसरणे अशक्य आहे. सर्वांना आवडणारे नेतृत्व होते. नाही हा शब्द त्यांचेकडे नव्हता त्यामुळे घराघरात, प्रत्येकाच्या हृदयात पोंहचले होते. त्यामुळे आपल्यात नाहीत असे वाटत नाही. त्यांच्या स्तृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन!

# लोकनेते विलासराव देशमुख: विकासाची दूरदृष्टी असलेले दिलखुलास व्यक्तिमत्व, एक निष्ठावंत राजकारणी



महाराष्ट्राच्या राजकारणात दूरदृष्टी, अभ्यासू वृत्ती आणि अजातशत्रू व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जाणारे लोकनेते विलासराव देशमुख हे एक असे नेते होते, ज्यांनी सरपंचपदापासून ते राज्याच्या सर्वोच्च मुख्यमंत्रीपदापर्यंत तसेच केंद्रीयमंत्रीपदा पर्यंत प्रवास केला. त्यांच्या दिलखुलास स्वभावाने त्यांनी केवळ मित्रच नव्हे, तर राजकीय विरोधकांनाही आपलेसे केले. हा त्यांचा गुण संसदीय लोकशाहीची ऊंची वाढवणारा आहे, त्यांच्या वक्तृत्वाची, भाषणाची खास शैली आणि शब्दांवरील पकड आजही अनेकांच्या स्मरणात आहे. त्यांच्या १३ व्या स्मृतिदीनानिमित्त त्यांच्या कार्याचे स्मरण करणे आणि त्यांचे विचारकार्य पूढे घेऊन जाणे हीच खरी त्यांना आंदराजली ठरेल.

आदरणीय विलासराव देशमुख यांच्या राजकीय प्रवासाची सुरुवात १९७४ मध्ये बाभळगावच्या सरपंचपदापासून झाली. त्यानंतर त्यांनी पंचायत समिती उपसभापती आणि जिल्हा परिषद सदस्य अशी विविध पदे भूषवली. १९८० मध्ये ते पहिल्यांदा आमदार म्हणून निवडून आले. १९९५ च्या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला, जो सर्वांसाठी एक मोठा धक्का होता. मात्र, यानंतरही त्यांनी पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणात दमदार पुनरागमन केले. ते दोन वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले (१९९९-२००४ आणि २००४-२००८). त्यांच्या कार्यकाळात राज्याच्या पायाभूत सुविधांच्या विकासाला गती मिळाली. त्यांनी सार्वजनिक वाहतूक, रस्ते आणि जलसंधारणाच्या योजनांवर भर दिला. मुख्यमंत्री म्हणून त्यांनी शैक्षणिक सुधारणा, कृषी विकासाच्या योजना आणि सामाजिक न्यायाशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले, ज्यामुळे सर्वसामान्यांच्या जीवनात सुधारणा झाली.

आपण पाहतो आजकाल राजकारणाचा चेहरामोहरा बदलताना दिसतो आहे. सत्तेसाठी पक्षांतर करणे, विचारांना तिलांजली देणे आणि खुर्चीलाच सर्वोच्च मानणे हे राजकारणाचे नवीन सूत्र बनले आहे. पक्षनिष्ठा, वैचारिक बांधिलकी या गोष्टी जणू कालबाह्य झाल्या आहेत, असेच वाटत आहे. अशा परिस्थितीत, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे स्मरण होणे स्वाभाविक आहे. त्यांनी राजकारण केवळ सत्तेचे साधन न मानता, जनतेची सेवा करण्याचे माध्यम मानले.

आपल्या संपूर्ण राजकीय कारकिर्दीत, विलासराव देशमुख यांनी काँग्रेस पक्ष आणि त्याच्या पुरोगामी विचारधारेला कधीही सोडले नाही. त्यांच्यासाठी पक्षनिष्ठा ही केवळ एक राजकीय सोय नव्हती, तर ती एक नैतिक बांधिलकी होती. त्यांनी काँग्रेसच्या विचारांचा वापर राज्याच्या आणि लोकांच्या विकासासाठी केला. त्यांच्या कार्यकाळात घेतलेले निर्णय आणि भूषवलेली पदे पाहिली तर याची प्रचिती येते.

विलासराव देशमुख यांनी राजकारणाची सुरुवात स्थानिक स्वराज्य संस्थांमधून केली. यामुळे त्यांना ग्रामीण भागातील तळागाळातील लोकांचे प्रश्न जवळून समजून घेता आले. सहकार संस्थांचा वापर केवळ आर्थिक विकासासाठीच नव्हे, तर सामाजिक बदलांसाठी कसा करता येतो, हे त्यांनी दाखवून दिले. स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहन देऊन त्यांनी समाजकारणालाही पाठिंबा दिला. विधानसभा आणि संसद ही केवळ चर्चा करण्याची ठिकाणे नसून, लोकांच्या कल्याणासाठी निर्णय घेणारी पवित्र मंदिरे आहेत, अशी त्यांची धारणा होती. या सर्व स्तरांवर काम करताना त्यांनी काँग्रेसची विचारधारा जपली आणि ती जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला.

विलासराव देशमुख यांचे राजकारण हे स्वार्थावर आधारित नव्हते, तर ते पक्षनिष्ठा, विकास आणि लोककल्याण या तत्त्वांवर आधारित होते. आजच्या अस्थिर राजकीय परिस्थितीत, त्यांचे कार्य आणि विचार हे मार्गदर्शक दीपस्तंभासारखे आहेत.

शब्द त्यांचे जणू, विचारांचा झरा,
राजकारणाचा त्यांनीच, बदलला चेहरा.
विचारांशी निष्ठा, पक्षालाच मान,
लोकांच्या कल्याणाचे, ठेवले ध्यान.

आदरणीय विलासराव देशमुख यांचे सहकार क्षेत्रातील कार्य अत्यंत उल्लेखनीय आहे. दुष्काळी मराठवाड्यात त्यांनी सहकार चळवळ रुजवली आणि ती यशस्वी करून दाखवली. त्यांच्या दूरदृष्टीमुळे मांजरा परिवारातील सहकारी साखर कारखाने आणि लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांसारख्या संस्था उभ्या राहिल्या. आज या संस्थांमुळे परिसराचा कायापालट झाला आहे. त्यांच्या प्रयत्नांनी मांजरा काठच्या ऊसाची कांडी सर्वोत्तम दरामुळे सोन्याची कांडी झाली आहे.

लातूर जिल्ह्याशी त्यांचे नाते अतूट होते. त्यांनी घेतलेल्या प्रत्येक पदाचा उपयोग लातूरच्या विकासासाठी केला. भूकंपानंतर लातूरच्या पुनर्वसनासाठी त्यांनी केलेले काम अविस्मरणीय आहे. त्यांनी लातूरला विकासाच्या नवीन दिशेने नेले आणि ‘‘जे नवे ते लातूरकरांना हवे‘‘ हा मंत्र प्रत्यक्षात आणला. त्यांच्या नेतृत्वामुळे आणि सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या नियोजनामुळे १६ ऑगस्ट १९८२ रोजी लातूरला जिल्ह्याचा दर्जा मिळाल्यानंतर येथील विकासाला गती मिळाली. आज माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख आणि माजी आमदार धीरज विलासराव देशमुख हे त्यांच्या या वाटचालीस नवी दिशा देत आहेत.

**विचारांची निष्ठा कधीच न सोडली,**
**राजकारणाची रीत त्यांनीच जोडली.**
**सहकाराची चळवळ यशस्वी केली,**
**लातूरच्या विकासाला दिशाच दिली.**

मुख्यमंत्री म्हणून त्यांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी भरीव काम केले. त्यांनी गरीब आणि वंचित घटकांसाठी अनेक योजना सुरू केल्या आणि राज्याच्या विविध क्षेत्रांत प्रगती साधली. देशासाठी त्यांनी केंद्रीय अवजड उद्योग मंत्री म्हणूनही महत्त्वाचे योगदान दिले. सर्व समाजाला सोबत घेऊन काम करण्याची त्यांची पद्धत विशेष लोकप्रिय होती. त्यांच्याकडे समाजातील प्रत्येक घटकासाठी काहीतरी करण्याची तळमळ होती, ज्यामुळे त्यांनी एक व्यापक आणि सर्वसमावेशक नेतृत्व सिद्ध केले.

आदरणीय विलासराव देशमुख यांनी त्यांच्या कारकिर्दीत घेतलेले अनेक निर्णय राज्याच्या विकासासाठी मैलाचा दगड ठरले. त्यांनी राज्यातील शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी केली, वीजबील माफ केले, आणि अवकाळीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना विशेष अनुदान दिले. विदर्भातील शेतकऱ्यांसाठी विशेष पॅकेज जाहीर केले. शैक्षणिक क्षेत्रातही त्यांनी लातूरला शासकीय कृषी महाविद्यालय, वैद्यकीय महाविद्यालय, जैवतंत्रज्ञान महाविद्यालय आणि विद्यापीठ उपकेंद्र आणले.



**राहूल हरिभाऊ इंगळे पाटील**
रा.करकट्टा ता.जि.लातूर
मो. ९८९०५७७१२८

आपण माजी मुख्यमंत्री व माजी केद्रींय मंत्री लोकनेते विलासराव देशमुख यांची १४ ऑगस्ट रोजी १३ वा स्मृतीदीन साजरा करीत आहोत. आदरणीय विलासराव देशमुख यांनी ज्या ज्या पदावर काम केले तेथून विकासाला गती आणि लोकांच्या कल्याणाला चालना देण्याचे काम केले. नक्षत्रामध्ये जसे सुर्य उर्जेचा स्त्रोत म्हणून काम करतो तसे राजकारणाच्या नभात विलासराव देशमुख नावाचे वलय आपल्याला कायम प्रेरणा देत राहणार आहे.

**विकासाचे बीज, पेरले त्यांनी,**
**राजकीय नभात, वलय तेजस्वी.**
**आजही त्यांचे कार्य, दिशा दावी,**
**स्मृती ही त्यांची, प्रेरणाच भावी.**

आदरणीय विलासरावजी देशमुख साहेब या अलौकीक आणि कर्तबगार नेतृत्वाचा आज स्मृतिदिन आहे, त्यांना मनापासून शत:शा नमन, विनम्र अभिवादन ...!

# यदा यदा ही धर्मस्य ग्लानिर्भवति भारत । अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।।

**यदा यदा ही धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।।**
श्रीमद्भगवद्गीता अध्याय ४/७

दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी गोकुळाष्टमी व्रत आहे. सदरील संस्कृत श्लोकांमध्ये भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला उपदेश करताना आपण अवतार का व केव्हा घेतो हे सांगितले आहे. याच दिवशी भगवान श्रीकृष्ण दुष्टांचा संहार करण्यासाठी आणि साधुसंताना अभय देण्यासाठी पृथ्वीतलावर अवतीर्ण झाले. तसेच १५ ऑगस्ट १९४७ याच दिवशी भारत देश इंग्रजाच्या जोखडातून मुक्त झाला. त्यामुळे हे दोन्ही आनंद उत्सव साजरा करण्याचा योग भारतीयांना आला आहे.

भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला माध्यम करून जगताला उपदेश करतात ते म्हणतात ‘‘जेव्हा जेव्हा धर्माला ग्लानि येईल म्हणजेच धर्माची हानी होईल अधर्माची वाढ होईल तेव्हा तेव्हा मी साकार रूपाने प्रकट होतो.‘‘ या ठिकाणी भगवान श्रीकृष्णाने कोणत्याही धर्माचा उल्लेख केलेला नाही. त्यांना अपेक्षित असलेला धर्म म्हणजेच मानवता धर्म होय. समाजामध्ये काही दुष्ट प्रवृतिचे लोक निष्कारण भगवत प्रेमी, धर्माने चालणाऱ्या, चांगले वर्तन करणाऱ्या निरपराध पण दुर्बल मनुष्यावर नास्तिक लोक अन्याय करतात. समाजातील लोक अन्यायाचा प्रतिकार करत नाहीत किंवा प्रतिकार करण्यासाठी त्यांचे प्रयत्न कमी पडतात. त्यामुळे अन्याय करणाराची प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढत जाते. यावर बोलताना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की अन्याय करणारा जेवढा गुन्हेगार आहे. त्यापेक्षा अन्याय सहन करणारा जास्त गुन्हेगार आहे. अन्याय करणारे म्हणजेच अधर्मने वागणाऱ्या लोकांमुळे अधर्माची वृद्धी होते आणि धर्माचा ऱ्हास होतो. याचे प्रमुख कारण म्हणजे नाशवान पदार्थाचे आकर्षण होय. नाशवंत पदार्थाच्याकर्षण असल्यामुळे ते आपल्या संग्रह असावेत असे अधर्माने वागणाऱ्या लोकांना वाटते. अशी समान इच्छा असणारे काही लोक एकत्र येतात आणि धर्माने वागणाऱ्या लोकांवरती अन्याय करायला लागतात. त्या काळच्या परिस्थितीचे वर्णन नामदेवराय आपल्या अभंगाद्वारे करतात.

**पापी जे भक्त दैते ते मातले।धरणीसीं झाले ओझे त्यांचे ।।१।।**
**दिधलासे त्रास ऋषीमुनी सर्वा ।न पूजिती देवा कोणी एक।।**
**संत नामदेव ।**

त्या काळात असुरांचा प्रमुख असणारा कंस याने चाणुर, मुष्टीर, तृणवृत, पुतना, मामळ, जरासंध, इ. अनेक सुरांना सोबत घेऊन राजा उग्रसेनाकडून मथुरेचे राज्य आपल्या ताब्यात घेतले आणि जनतेचा अतोनात छळ चालू केला या छळाला जनता अगदी कंटाळून गेली होती. हा छळ पृथ्वीला सहन न झाल्याने पृथ्वीने गाईचे रूप घेऊन ब्रह्मदेवा गेली.

**वत्सरुपी पृथ्वी ब्रह्मयापाशीं जाय। नेत्री वाहे तोय सांगतसे। बुडविला धर्म अधर्म झाला फार।सोसवेना भार मजआता।।५।**
**संत नामदेव ।**

ब्रम्हदेव,भगवान शंकर, इंद्र इ. देवतांना घेऊन पृथ्वी भगवान श्री विष्णूकडे गेली.सर्वानीं पृथ्वीला या राक्षसांच्या जोखडा तून मुक्त करण्याची विनंती केली. तेव्हा भगवान श्री विष्णूने आपण कंसाची बहिण देवकी आणि वसुदेव यांच्या पोटी आठव्या मुलाच्या रूपाने अवतीर्ण होणार असल्याचे सांगितले.

आकाशाची वाणी सांगे सकळाशी।
तळमळ मानशी करू नका ।।१।।
देवकीच्या गर्भा येईल भगवान
।रक्षण ब्राह्मण गाई भक्त।।२।।
संत नामदेव ।

भगवंताने असे आश्वासन दिल्यानंतर भगवान शंकर, ब्रह्मदेव, इंद्र आणि पृथ्वी आपल्या स्वस्थळाशी आले. त्यानंतर भगवान श्रीविष्णुने अवताराचे नियोजन करून शेषनाग याला बळीराम दादाच्या रूपामध्ये आणि माता लक्ष्मीला रुक्मिणीच्या रूपात यायला सांगितले. भगवान देविकाच्या उदरात येणार हे कळाल्यामुळे पृथ्वीवर आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

**मयुरादि पक्षी नृत्य करीताती। नद्या वाहताती दोन्ही थड्या।।**
**भूमीवरी सडे केशर कस्तुरी ।आनंद अंतरी सकाळच्या ।२।**

अशा रीतीने भगवान श्रीविष्णुने श्रीकृष्णाच्या रूपामध्ये श्रावण वद्य अष्टमी या दिवशी अवतार घेतला. जरी भगवंताने दुष्टांचा नाश करण्यासाठी अवतार घेतला असला तरी लागलीच दुष्टांचा नाश केला नाही. भगवंताने सर्वात आधी दुर्बलला सबल करण्याची मोहीम हाती घेतली. गोकुळामधून मथुरेला जाणारे दही दूध तूप लोणी हे प्रसंगी चोरी करून गोकुळातीलच गोपाळांच्या मुखामध्ये घातले. त्यांचे संघटन केले. संघटन झाल्यानंतर आपण गोवर्धन गिरी सारखा पर्वत सहज उचलू शकतो ही जाणीव करून दिली. जीवनामध्ये आपल्या कर्तव्याला प्राधान्य देऊन जीवन आनंदी कसे घालवावे हे ही भगवान श्रीकृष्णाने आपल्याला शिकवले. जीवनात कितीही संकटे आली तरी त्या संकटातही आनंदी राहण्याचा मंत्र भगवान श्रीकृष्णाने आपल्याला दिला. कंसाला मारल्यानंतर ते राज्य राजा उग्रसेनाच्या हाती सोपवले. यावरून श्रीकृष्णाची उदारता आपल्या लक्षात येते. इत्यादी गुणामुळे भगवान श्रीकृष्ण संपूर्ण मानव जातीला एक आदर्श राजकर्ते, कुशल संघटक, उत्तम व्यावसायिक, पुरुषोत्तम असे अनेक गुण भगवान श्री कृष्णाच्या चरित्र मध्ये आढळून येतात. भगवान श्रीकृष्ण हजारो वर्षापासून मानव जातीला प्रेरणादायी ठरत आहेत. म्हणून श्रीकृष्णाची हा जन्मदिवस गोकुळाष्टमी या नावाने साजरा केला जातो.त्यांच्याकडून प्रेरणा आपल्या जीवनात यावी हीच सदिच्छा.

**ह.भ.प. बळीराम महाराज कवडे**
**९६२३७४०९०१**
**शब्दांकन – विलास मुळीक**

# वीरशैव तेली समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न



**प्रतिनिधी/लातूर**

शहरातील वीरशैव तेली समाजातील इयत्ता दहावी , बारावी, नीट ,सीईटी तसेच एमपीएससी, यूपीएससी व इतर स्पर्धा परीक्षेत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार वीरशैव तेली समाजाच्या करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजाचे अध्यक्ष किशोर भुजबळ होते तर प्रमुख पाहुणे म्हणून लोहा येथील गटशिक्षणाधिकारी सतीश व्यवहारे, कौटुंबिक न्यायालय से. ने.प्रबंधक मल्लिकार्जुन कलशेट्टी हे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी यथोचित सन्मान करण्यात आला. समाजाचे अध्यक्ष किशोर भुजबळ वीरशैव तेली समाजाच्या वतीने वर्षभरात जे काही सामाजिक कार्यक्रम होतात त्याचा लेखाजोखा त्यांनी या कार्यक्रमात मांडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. पल्लवी व्यवहारे यांनी केले तर आभार सुदर्शन क्षीरसागर यांनी मानले.

यावेळी समाजाचे आधारस्तंभ मन्मथआप्पा लोखंडे, सचिव एडवोकेट अजय कलशेट्टी, सहसचिव इंद्रजीत राऊत, शिक्षण समितीचे प्रमुख हरनाळे, कोषाध्यक्ष सुदर्शन क्षीरसागर, युवराज लोखंडे, मुन्ना भुजबळ, रामलिंग काळे, उमाकांत क्षीरसागर, कृष्णा खडके, दत्ता लोखंडे, नागनाथ भुजबळ, श्री भीमाशंकर देशमाने, कार्यक्रमास महिला समिती सदस्य सौ. वनिता व्यवहारे ,सौ. सारिका क्षीरसागर, अनुसया देशमाने सह समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रेणा सहकारी साखर कारखाना येथे लोकनेते श्रध्देय विलासराव देशमुख साहेब यांच्या स्मृतिदिनी विविध कार्यक्रमाचे आयोजन



रेणापूर : राज्य व देशभरात आपल्या विकास कार्यातून सर्वांच्या मनात घर केलेले लोकनेते श्रध्देय विलासराव देशमुख साहेब यांच्या १३ व्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने १४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता कारखाना साईट येथे लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास चेअरमन,व्हा चेअरमन व संचालक मंडळाच्या उपस्थितीत पुष्पांजली अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे. सकाळी ११ वाजता कारखाना परिसरात रक्तदान शिबीर व वृक्षारोपण केले जाणार आहे तसेच सायंकाळी ६ वाजता कातपुर रोड येथील संत गाडगेबाबा अनाथ /मतीमंद मुलांचे बालगृहातील मुलांना अन्नसेवा दिली जाणार आहे.

# लोकमान्य लोकनेते विलासरावजी देशमुख

राज्यात चांद्यापासून बांध्यापर्यंत शहरापासून ग्रामीण भागातील लोकांत विकासभिमुखं लोकमान्य लोकनेते म्हणून राज्याचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख साहेब यांचा जागर आजही राज्यात अजूनही कार्यरत आहे असा एकही दिवस जात नाही की लोकांच्या आठवणीत कायम घर करून बसलेल्या सर्वसामान्यांचे आधारवड म्हणून राज्यातील शेतकरी असो की सर्वसामान्य जनता ,प्रशासकीय अधिकारी असो आजही राज्यात सर्वात लोकप्रिय लोकमान्य लोकनेते म्हणून विलासरावजी देशमुख साहेब यांचा आजही उल्लेख होतोय त्यांचा आज १४ ऑगस्ट रोजी स्मृती दिनानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करतो आज साहेब यांच्या स्मृती दिनी बाभळगाव येथे त्यांच्या समाधी स्थली लोक येतात इतकी अफाट प्रचंड लोकप्रियता मिळवलेले विलासराव देशमुख साहेब यांच्या स्मृती स्थळी येतात आठवणींना उजाळा देतात त्यांच्या कार्याचा कितीही गौरव केला तर ते शब्द अपुरे पडतात इतक कार्य केलेले लोकमान्य लोकनेते विलासराव देशमुख साहेब राज्यात नव्हे तर देशात सर्वात उत्कृष्ठ रित्या कार्य केलेले पहिले मुख्यमंत्री म्हणून त्यांचा देशात नावलौकिक राहिलेला आहे

**दुष्काळ भाग विकसनशील झाला**

राज्याचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख साहेब मुख्यमंत्री झाले अन् दुष्काळ भाग विकसनशील म्हणून दिसू लागला पश्चिम महाराष्ट्रात दुष्काळी भाग म्हणून मराठवाडा प्रसिद्ध होता त्यावेळेस लोकनेते विलासराव देशमुख यांनी या भागातील दुष्काळ भागात साखर कारखाने सुरू केले अनेक सहकारी संस्था उभ्या केल्या या भागातील शेतकरी शेतमजूर यांच्या हाताला काम मिळाले साखर उद्योग उभे केल्याने या भागातील शेतकऱ्यांना जास्तीचे भाव दिल्याने शेतकरी समृध्द झाला आज मराठवाड्यात संभाजीनगर नंतर विकसनशील शहर म्हणून लातूरचा उल्लेख होतो याचे सर्व श्रेय लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांच्याकडे जाते हे सर्वांना मान्यच करावे लागेल त्यामुळे लातूर आणि दुष्काळी भाग पुसून काढण्यात लोकनेते विलासराव देशमुख साहेब पूर्णपणे यशस्वी ठरले आहेत

सहकार चळवळ वाढवली

राज्यात एकीकडे सहकार चळवळ मोडीत निघत असताना मराठवाड्यात केवळ लातूर जिल्हा बँक मांजरा साखर परिवारातील साखर उद्योग व्यवस्थित चालु होते इतर सहकारी संस्था कारखाने बंद होते त्याही साखर कारखान्यास राजकीय जोडे बाजूला ठेवून सर्वांना सहकार्य करण्याची भूमिका विलासराव देशमुख साहेब यांनी बजावली मराठवाड्यात अनेक साखर उद्योग बंद पडलेले होते त्यात नांदेड परभणी संभाजीनगर बीड लातूर येथील साखर कारखान्याना मदत करण्याचे काम लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांनी केलें प्रतेकाना मदत करण्याची भूमिका निभावली अस नेतृत्व मिळणे आज

**हरीराम कुलकर्णी**
जेष्ठ पत्रकार लातूर
९९७००८१०७७

तरी कठीण आहे असे आमच्या सारख्या पत्रकार लोकांना किंवा कार्यकर्त्यांना वाटते

**मांजरा साखर परिवारातील साखर उद्योग शेतकऱ्यांचे मंदिर झाले**

राज्यात एकीकडे साखर कारखान्याकडून उसाचे गाळप करून एक दोन वर्ष पैसे मिळत नाही योग्य भाव मिळत नाही अशी ओरड आपण ऐकतो लातूरच्या मांजरा परिवाराने लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांनी जे नियम घालुन दिलेले आहेत तेच नियम पुढें आजही माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली माजी मंत्री आमदार अमित विलासरावजी देशमुख,जिल्हा बँकेचे चेअरमन धीरज विलासरावजी देशमुख हे मांजरा साखर परिवारातील साखर उद्योगात सर्वाधिक भाव देण्याचा विक्रम मराठवाड्यात मांजरा साखर परिवाराचा आहे तेही उसाला योग्य दर त्याच बरोबर ऊस गाळप झाल्यानंतर वीस दिवसात त ऊस उत्पादक यांच्या खात्यावर ऑनलाईन पैसे जमा होतात हे विशेष आहे त्यामुळें गेली १५ ते २० वर्षात जिल्ह्याची आर्थिक परिस्थिती चांगली सुधारली आहे आज जिल्ह्यातील शेतकऱ्यांची मुल उच्च शिक्षित झाले आहेत अनेक मोठया पदावर विराजमान झाले आहेत याचे सर्व श्रेय लोकनेते विलासराव देशमुख, यांच्या नेतृत्वाखाली माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांच्याकडे जाते हे सत्यच आहे जिल्ह्यातील साखर कारखाने शेतकऱ्यांची मंदिरे बनली आहेत.

**लातूर जिल्हा बँकेमुळे सहकार चळवळ अधिक मजबूत**

लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांनी मुख्यमंत्री झाल्यावर सहकार चळवळ अधिक मजबूत करण्यासाठी आवश्यक मदत केली त्याला माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांनी अधिक पूढे घेवून ती टिकवली आहे त्यामुळे आज राज्यात सहकार चळवळ म्हटले लातूरचा उल्लेख होतो लातूर जिल्हा बँक ही माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली चालते बँकेचे चेअरमन धीरज विलासरावजी देशमुख यांच्या नेतृत्वात जिल्हा बँकेने प्रगती केली जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी आवश्यक प्रयत्न केले शेतकऱ्यांना हार्वेस्टर साठी तब्बल १०४ कोटी रुपये देवुन शेतकऱ्यांची मुल आज उद्योजक तयार केली आहेत त्यामुळे राज्यात नव्हे देशात लातूर बँक नावाजलेली आहे पाच लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज पुरवठा करण्यात लातूर जिल्हा बँक यशस्वी ठरलेली आहे हे सर्व लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेले कार्य पुढे देशमुख कुटुंबातील सदस्य पूढे वारसा चालवत आहे आज साहेब नसले तरी दररोज एकदा तरी आम्हा सारख्या पत्रकार लोकांना कार्यकर्त्यांना आठवण आल्याशिवाय रहात नाही आज साहेबांचा १३ वा स्मृती दिनानिमित्त विनम्र अभिवादन करतो

**दीपस्तंभ हा विचारांचा जपून ठेवा लोकसेवेचा स्मरण होत तुमचे**

**चेतन लाभते मणाला शुद्ध निर्मळ केली लोकसेवा**



**आपल्या नेतृत्वाचा महिमा**
**लोकसेवेचा**
**हा वसा आपला लाभला वारसा**
**तुमच्या कार्याची ज्योत युगायुगासाठी प्रेरणा स्तोत्र**
**लोकसेवेचा मार्ग दाखविला आपला महिमा अमर**



**होमवर्क: हे चित्र पहा आपल्या आवडीचा आणि योग्य कलर ह्या चित्रामध्ये भरा**

## मराठयांचा सागरी पराक्रमाचा साथीदार - खांदेरी (जि. रायगड)

घहरपवशीळ ऩ्रींमराठयांच्या ताब्यातील खांदेरी म्हणजे जणू मुंबईकर इंग्रजांच्या काळजावर रोखलेला खंजीरच होता. जंजिरेकर सिद्दी अन् मुंबईकर इंग्रजांची हातमिळवणी थांबावी म्हणून खांदेरीवर शिवरायांनी अजोड जलदुर्ग उभारला. त्यांच्या बांधणीतील कच्चेपणा दूर करण्यासाठी सागरी दुर्ग उभारणीत त्यांनी आगळा वेगळा प्रयोग करून पाहिला. शिवछत्रपतींची दूरदृष्टी अन् मराठयांचं वाढतं सागरी सामर्थ्य याची खूण म्हणजे हा खांदेरीचा जलदुर्ग.

खांदेरीच्या किल्लयाला कसे जायचे?

खांदेरीच्या किल्लयावर जायचे तर प्रथमत: पुणे किंवा मुंबईहून अलिबाग येथे एस.टी. च्या बसने पोचावे लागते. शिवाय मुंबईहून भाऊचा धक्का ते रेवसपर्यंत लाचही जाते. रेवसहून पुढे अलिबागपर्यंत एस.टी. बसही जाते. खांदेरीचा किल्ला सर्वसामान्य नागरिकांना भेट देण्यास मुक्त नाही. तिथे भारतीय नौसेनेचा तळ आहे, तिथे दीपगृहही आहे. तेथे काम करणाऱ्या कर्मचा-यांना नेण्या-आणण्यासाठी मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्या नियंत्रणाखाली बोटींची वाहतूक चालते ती सुध्दा आठवडयातून एकदा.



## डॉक्टर टिप्स

**वैवाहिक जीवनाच्या सुखाचा उपभोग घेत असताना महत्वाच्या गोष्टी**



- ग्रीक जोडपे एका वर्षात सरासरी १३८ वेळा वैवाहिक सुख घेतात. तर जपानी जोडपे सगळ्यात कमी म्हणजे ४५ वेळा वैवाहिक सुख घेतात.
- पुरुषांच्या लिंगातून वीर्य निघण्याची गती ३६.९ कि.मी. प्रति तास इतकी असते, जो उसेन बोल्टचा १०० मीटर चा रेकॉर्ड तोडण्यासाठी पुरेसे आहे.
- एका वयस्कर पुरुषांच्या अंडकोषात एवढे शुक्राणू असतात कि त्यांना ४०४ मीटर पर्यंत पसरून ठेऊ शकतात.

हे देखील वाचा: वैवाहिक जीवन सुधारण्यासाठी विशेष टिप्स

हे देखील वाचा: राशी आणि वैवाहिक जीवन बद्दल माहीती



- एका छोट्या कैप्सूल मध्ये इतके शुक्राणु येऊ शकतात कि ज्यामुळे सध्या पृथ्वी वर असलेल्या जनसंखेपेक्षा जास्त जनसंख्या बनवली जाऊ शकते.१२.वैवाहिक जीवनाचा जोडीदारासोबत आनंद घेत असताना, मनुष्याच्या दाढी सामान्य वेळे पेक्षा जास्त वेगाने वाढते

## विनोद




मूर्खपणाची उंची किती असू शकते ?
तुमची उंची किती आहे ?

## संदेश

RABBA DUKH NA DENA
MERE DOST KO
CHAHE MUJHE SUKHO KA
PAHAD DEDE
NAYI CYCLE PAR GHUME
DOST MERA
MUZE BHALE HI PURANI
BMW CAR DEDE...

## सुविचार



पवित्र असावे पण पतित होऊ नये.

**अज्ञात**

**संस्कृत सुभाषित**

**अनागतं य: कुरुतेस शोभते ।**
**स शोचते यो न करोत्यनागतम्।।**

अर्थ: जो आगामी संकटाचा विचार करतो तो सुखी असतो आणि जो त्याचा विचार करीत नाही त्याला दु:ख सोसावे लागते.

## मनोरंजक महाशब्दकोडे



आडवे शब्द
१. सुंदर पती-पत्नीचा जोडा
५. हार
८. काळे ज्वालाग्रही खनिज
११. मऊ, मृदू
११अ. दारुचा एक प्रकार
१२. यजमान, पती
१४. रक्षण करणारा
१५. बाजार
१६. पावसाची झड
१७. पापणी न हलवता (पाहणे)
१९. सरपणाचे दुकान
२१. संत रामदासस्वामी यांनी रचलेला ग्रंथ
२४. जोम, मस्ती
२५. अवस्था, दशा
२७. पंख
२८. तुरुंग
२९. काठाच्या नक्षीप्रकारामुळे प्रसिद्ध धोतरप्रकार ---- काठी
३१. वर्ष
३२. अडकित्त्याने कातरण्याचे विड्यात घातले जाणारे फळ
३४. हळद पिऊन का अशी होता येणार?
३५. कागदावर आखलेला कप्पा
३७. आचारी
३९. माफी मागणारा
४२. दिवाणखाना
४३. सत्य
४४. अतिरेक, टोक
४५. मोठे गाव
४७. मातापिता
५१. कुटी
५२. कागदाचे एक परिमाण
५३. ढीग, चळत
५४. शाळेतील शिक्षिका
५५. केस काळे करण्याचे साधन
५७. वेल
५९. समुद्र
६१. विनोबाजींच्या गीतेवरील ओव्या
६३. लढतना मृत्यू येणे
६५. अखंड
६६. दृष्ट
६७. स्त्री
६८. रोखलेली नजर
६९. शेळी
७१. मैत्रीण
७२. ठराविक पैसे
७४. पायंडा, पद्धत
७६. दरोडा
७८. धोकादायक
८०. माणूस
८२. सूर्याचे एक नाव
८४. सटकन, पटकन
८५. मातीचा कण
८६. दुसऱ्यासाठी केलेला खर्च

उभे शब्द
१. रत्नजडित माळ
२. अंत:करण
३. किंमत
४. नमन
५. मागील अंगणाचा दरवाजा
६. मीठ
७. अरण्य
८. नवाकोरा
९. रेचक
१०. एक पालेभाजी
१३. दरारा, इभ्रत, वजन
१८. सुसर
२०. जनगणना
२२. नरमांजर
२३. पृथ्वी
२५. भूतकाळ
२६. चिंतन
२७. परीक्षा घेणारा
३०. आशीर्वाद देणारी
३१. मित्र
३३. प्रयत्न
३६. बेकरीतील एक गोड पदार्थ
३८. पहाटेची गाढ निद्रा
४०. तुळशीमाळ धारण करणारा
४१. पार्थिवावरचे वस्त्र
४५. यमपुरी
४६. घरातील मोठी माणसे
४८. घाबरणे
४९. एक बारीक धान्य
५०. पायाचे उभे हाड
५४. स्त्रीलंपट
५६. चकचकीत, स्वच्छ
५८. चांदणी
५९. भेग, चीर
६०. किल्लेदार
६२. दिवसाचा चोविसावा भाग
६४. धनुष्यबाण
६५. अफूचे बी
६७. पूर्ण नेस्तनाबूत
६९. भाजपची विद्यार्थी संघटना
७०. ज्ञाती
७३. विचारांचे, भावनांचे इंद्रिय
७५. होडी
७७. वसन, वस्त्र
७९. बशीचा जोडीदार
८१. नवरामुलगा
८३. तीक्ष्ण नजरेचा पक्षी

आडवे उत्तर
१.रतिमदन ५.पराभव ८.कोळसा ११.नरम ११अ.रम १२.नवरा १४.रक्षक १५.हाट १६.सर १७.टकमक १९.वखार २१.दासबोध २४.रग २५.गत २७.पर २८.कारा २९.करवत ३१.सन ३२.सुपारी ३४.गोरी ३५.रकाना ३७.खानसामा ३९.क्षमायाचक ४२.दालन ४३.खरी ४४.कळस ४५.नगर ४७.जनकजननी ५१.झोपडी ५२.रीम ५३.चवड ५४.बाई ५५.कलप ५७.लता ५९.सागर ६१.गीताई ६३.धारातीर्थी पडणे ६५.सलग ६६.खल ६७.नारी ६८.टक ६९.अजा ७१.सखी ७२.रकम ७४.रीतभात ७६.डाका ७८.खतरनाक ८०.मानव ८२.रवि ८४.टपकन ८५.रज ८६.पदरमोड

उभे उत्तर
१.रत्नहार २.मन ३.दर ४.नमस्कार ५.परसदार ६.रामरस ७.वन ८.कोराकरकरीत ९.सारक १०.चाकवत १३.वट १८.मगर २०.खानेसुमारी २२.बोका २३.धरा २५.गतकाल २६.मनन २७.परीक्षक ३०.वरदायिनी ३१.सखा ३३.प्रयास ३६.नानकटाई ३८.साखरझोप ४०.माळकरी ४१.कफन ४५.नरक ४६.वडीलधारी ४८.कचरणे ४९.जव ५०.नडगी ५४.बाईलवेडा ५६.लखलखीत ५८.तारा ५९.सापट ६०.गडकरी ६२.तास ६४.तीरकमान ६६.खसखस ६७.नायनाट ६९. अभाविप ७०.जात ७३.मन ७५.तर ७७.कापड ७९.कप ८१.वर ८३.घार



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### द हंड्रेड'मध्ये लिव्हिंगस्टोनचे वादळ, गोलंदाजाला धू-धू धुतले

बर्मिंगहॅम-इंग्लंडमध्ये सुरु असलेल्या 'द हंड्रेड' क्रिकेट लीगमध्ये मंगळवार १२ ऑगस्ट रोजी बर्मिंगहॅम फिनिक्सने हंगामाच्या १०व्या सामन्यात ओव्हल इनव्हिन्सिबलचा ४ विकेट्सने पराभव केला. या सामन्यात, बर्मिंगहॅम फिनिक्सकडून लियाम लिव्हिंगस्टोनने शानदार फलंदाजी केली आणि २७ चेंडूत ६९ धावा केल्या. त्याच्या खेळीदरम्यान, त्याने रशीद खानच्या ५ चेंडूत २६ धावा केल्या. या दरम्यान, त्याने तीन षटकार आणि दोन चौकार मारले. याचा व्हिडिओ द हंड्रेडने त्यांच्या सोशल मीडिया अकाउंटवर शेअर केला आहे.

रशीद खानने टाकला सर्वात महागडा स्पेल : रशीद खानने या सामन्यात २० चेंडूत ५९ धावा दिल्या. या दरम्यान, त्याला एकही विकेट मिळाली नाही. रशीदच्या टी-२० कारकिर्दीतील हा सर्वात महागडा स्पेल ठरला. यापूर्वी, त्यानं आयपीएल २०१८ मध्ये पंजाब किंग्जविरुद्धच्या सामन्यात ५५ धावा दिल्या होत्या. या सामन्यातही, त्याच्या पाच चेंडूंच्या सेटनं सामन्याचा निकाल बदलला. यापूर्वी, रशीदनं मँचेस्टर ओरिजिनल्स आणि लंडन स्पिरिटविरुद्धच्या सामन्यात ३-३ विकेट्स घेतल्या होत्या.

विल समीद आणि लिव्हिंगस्टोनची शानदार खेळी : या सामन्याबद्दल बोलायचे झाले तर, बर्मिंगहॅम फिनिक्ससमोर हा सामना जिंकण्यासाठी १८१ धावांचे लक्ष्य होते. लिव्हिंगस्टोनच्या वादळी खेळीमुळे संघाने हे लक्ष्य ९८ चेंडूत ६ गडी गमावून पूर्ण केले. लिव्हिंगस्टोनने २७ चेंडूत ७ चौकार आणि ५ षटकारांसह या सामन्यात ६९ धावांचा तडाखा दिला. त्याच्याशिवाय विल समीदने २९ चेंडूत ५१ धावा आणि जो क्लार्कने १४ चेंडूत २७ धावा केल्या.

डोनोवन फरेराची खेळी व्यर्थ : यापूर्वी, ओव्हल इनव्हिन्सिबल संघ १०० चेंडू खेळल्यानंतर ८ गडी गमावून १८० धावा करु शकला. डोनोवन फरेरा यांनी संघासाठी २९ चेंडूत सर्वाधिक ६३ धावा केल्या. जॉर्डन कॉक्सनं ३० चेंडूत ४४ धावांची खेळी केली. याशिवाय सॅम करननं १४, सॅम बिलिंग्जनं १७ आणि रशीद खाननं १६ धावांचं योगदान दिले.

***

### पाकिस्तानचा २०२ धावांनी दणदणीत पराभव करत विंडीजने २-१ ने जिंकली वनडे मालिका

त्रिनिदाद -वेस्ट इंडिज क्रिकेट संघाने तिसऱ्या आणि शेवटच्या एकदिवसीय सामन्यात पाकिस्तानचा २०२ धावांनी पराभव केला. आणि तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका २-१ अशी जिंकली. या विजयासह विंडीज संघाने इतिहास रचला आहे. शाई होपच्या नेतृत्वाखालील वेस्ट इंडिजने ३४ वर्षांनी पाकिस्तानविरुद्ध एकदिवसीय मालिका जिंकली. वेस्ट इंडिजने याआधी १९९१ मध्ये पाकिस्तानविरुद्ध एकदिवसीय मालिका जिंकली होती. संघाच्या या ऐतिहासिक विजयात कर्णधार शाई होप आणि जेडेन सील्स यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील पहिला सामना पाकिस्तानने पाच विकेट्सने जिंकला. त्यानंतर डकवर्थ लुईस नियमानुसार वेस्ट इंडिजने दुसरा एकदिवसीय सामना पाच विकेट्सने जिंकला होता. यासह वेस्ट इंडिजने पाकिस्तानविरुद्धच्या टी-२० मालिकेतील पराभवाचा बदलाही घेतला. पाकिस्तानने तीन सामन्यांची टी-२० मालिका २-१ अशी जिंकली. शतकवीर होपला सामनावीरच्या पुरस्काराने गौरवण्यातआले. तर मालिकेत तीन सामन्यांमध्ये सर्वाधिक १० विकेट्स घेणारा जेडेन सील्स मालिकावीर ठरला.वेस्ट इंडिजने ठेवलेल्या आव्हानाचा पाठलाग करताना पाकिस्तानचे पहिले चार फलंदाज अपयशी ठरले. संघाचे आठ फलंदाज दुहेरी अंकाचा टप्पा गाठू शकले नाहीत. यातील पाच फलंदाजांना खातेही उघडता आले नाही. संघ २९.२ षटकांत ९२ धावांवर आटोपला. सॅम अयुब, अब्दुल्ला शफीक, कर्णधार रिझवान, हसन अली आणि अबरार अहमद यांना खातेही उघडता आले नाही. त्याच वेळी बाबर आझम फक्त नऊ धावा करू शकला. सलमान आगा ३० धावा, हसन नवाज १३ धावा आणि मोहम्मद नवाज नाबाद २३ धावा दुहेरी अंकाचा टप्पा ओलांडू शकले. हुसेन तलत एक धाव घेत बाद झाला आणि नसीम शाह सहा धावा काढून बाद झाला. वेस्ट इंडिजकडून जादेन सील्सने ७.२ षटकांत १८ धावा देत ६ विकेट्स घेतल्या. याशिवाय मोतीला दोन फलंदाजांना बाद केला. चेसने एक विकेट घेतली.

### ओडीआय सामन्यात २०२ धावांनी विजय

त्रिनिदाद-वेस्ट इंडिज क्रिकेट संघानं तिसऱ्या वनडे सामन्यात पाकिस्तानचा २०२ धावांनी पराभव केला. या विजयासह, विंडीज संघाने वनडे क्रिकेटमध्ये असा चमत्कार केला आहे, जो यापूर्वी कधीही झाला नव्हता. वनडे क्रिकेटच्या इतिहासात वेस्ट इंडिजनं पाकिस्तानला २०० किंवा त्याहून अधिक धावांच्या फरकानं पराभूत करण्याची ही पहिलीच वेळ आहे. त्याचबरोबर, वनडे क्रिकेटच्या इतिहासात धावांच्या बाबतीत वेस्ट इंडिजचा हा चौथा सर्वात मोठा विजय आहे.५० वर्षांत पहिल्यांदाच इतका मोठा विजय : पाकिस्तानविरुद्ध वेस्ट इंडिजचा सर्वात मोठा विजय १५० धावांचा होता. हा विजय त्यांनी २०१५ च्या वनडे विश्वचषकात क्राइस्टचर्च मैदानावर न्यूझीलंडविरुद्ध मिळवला होता.

# आशिया कपमध्ये टीम इंडिया पाकिस्तानवर बहिष्कार टाकणार?

## हरभजन सिंगचे मोठे वक्तव्य; म्हणाला, रक्त आणि पाणी



मुंबई-आशिया चषक २०२५ मध्ये भारत आणि पाकिस्तानचे संघ आमनेसामने येणार असल्याचं वेळापत्रकामुळे निश्चित झालं आहे. आशिया चषक २०२५ येत्या ९ सप्टेंबरपासून खेळवला जाणार आहे. तर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना १४ सप्टेंबरला होणार आहे. पण आता हरभजन सिंगच्या वक्तव्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना रद्द होणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

''रक्त आणि पाणी एकत्र नसतं. आपण त्यांना इतकं महत्त्व का देतो?'' असा प्रश्न हरभजन सिंगने उपस्थित केला आहे. आशिया चषकामध्ये भारत आणि पाकिस्तान एकमेकांविरूद्ध खेळणार असल्याच्या मुद्द्यावर बोलताना हरभजनने हे वक्तव्य केलं आहे.

भारत आणि पाकिस्तान दोन्ही देशांमध्ये सुरू असलेल्या तणावामुळे आशिया चषकातील सामन्यावर बहिष्कार टाकण्याची मागणी सातत्याने होत आहे. हरभजन सिंग अलीकडेच वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लीजेंड्स स्पर्धेचा भाग होता, जिथे इंडिया चॅम्पियन्सने पाकिस्तान चॅम्पियन्सविरुद्ध गट सामना आणि सेमी-फायनल सामने खेळण्यास नकार दिला. या संघात शिखर धवन, युवराज सिंग, हरभजन सिंग, इरफान पठाण, सुरेश रैना आणि युसूफ पठाण यांसारख्या अनुभवी खेळाडूंनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानबरोबर खेळण्यास स्पष्टपणे नकार दिला.आता आशिया कप २०२५ आधी, हरभजन सिंगचे म्हणणे आहे की, देश सर्वप्रथम येतो आणि सूर्याच्या नेतृत्वाखालील टीम इंडियानेही पाकिस्तानबरोबर खेळण्यास नकार द्यावा, असे त्याचे म्हणणे आहे. हरभजन सिंगने सांगितले, ''कोणत्या गोष्टींना महत्त्व दिले पाहिजे, हे समजून घेतले पाहिजे. खरंतर अगदी सोपे आहे. आपल्या देशाचा जवान सीमेवर उभा आहे. त्यांच्या कुटुंबापासून ते दूर राहतात. अनेकप्रसंगी त्यांना वीरमरण येते, शहीद होतात आणि पुन्हा आपल्या घरीदेखील परतू शकत नाही. जवान आपल्यासाठी खूप मोठा त्याग करतात. या जवानांच्या तुलनेत आपण एक साधा क्रिकेट सामना सोडू शकत नाही.''''''''सीमेवर लढाई सुरू असते, दोन देशांमध्ये तणाव-पूर्ण परिस्थिती आहे आणि आपण क्रिकेट खेळायला जातोय. जोपर्यंत हे मोठे प्रश्न सुटत नाहीत, तोपर्यंत क्रिकेट सामना होणे हा फारच लहानसा विषय आहे,'' असेही हरभजन सिंग पुढे म्हणाला.

''आपली जी ओळख आहे ती या देशामुळे आहे. भले तुम्ही खेळाडू असाल, कलाकार असाल किंवा मग अजून कोणीही, या देशापेक्षा मोठे कोणीच नाहीये. देश सर्वात आधी येतो. देशापुढे एखादा क्रिकेट सामना न खेळणे ही खूप क्षुल्लक गोष्ट आहे.'', असे हरभजन सिंग पुढे म्हणाला.

आशिया चषक २०२५ साठीचे सामने दुबईमध्ये होणार आहेत. या स्पर्धेसाठी ओमान, भारत, युएई आणि पाकिस्तान हे संघ एकाच गटात आहेत.



## सुपर फिट राहण्यासाठी हार्दिक पंड्या नेमकं काय खातो?

**नवी दिल्ली:** भारतीय क्रिकेट संघातील ऑल राउंडर हार्दिक पंड्या हा सध्याच्या घडीला जगातील सर्वात फिट क्रिकेटरपैकी एक आहे. पण फिट राहण्यासाठी हार्दिक पंड्या (क्रीवळज्ञ झरपवूर) नेमकं काय खात असेल असा प्रश्न त्याच्या फॅन्सला पडतो. आता स्वतःच्या डेली डायटबाबत ऑलराऊंडरने खुलासा केला आहे. ३ ऑगस्ट रोजी हार्दिक पंड्या इंस्टाग्रामवर लाईव्ह आला होता. यावेळी चाहत्यांच्या प्रश्नांची उत्तर देताना त्याला विचारण्यात आलं की, 'तू नाश्ता, दुपारचं जेवण आणि रात्रीच्या जेवणात काय घेतोस?'

कसं असत हार्दिक पंड्याचं रुटीन?

हार्दिक पंड्या म्हणाला की, 'मी सकाळी उठतो आणि स्वतःला हायड्रेट ठेवण्यासाठी ५०० मिलीलीटर पाणी पितो, जेणेकरून त्यानंतर मी लगेचच जिमला जाऊ शकेन. आपल्या दिवसाची सुरुवात हायड्रेशन बूस्ट सोबत केल्यावर नाश्त्यामध्ये जवळपास ६५० कॅलरीज आणि ३० ग्रॅम प्रोटीनमध्ये भरपूर पॉवर पॅक स्मूदी असते. नाश्त्यात सूर्यफुलाच्या बिया, ओट्स, एवोकाडो, बदाम, बदामचं दूध आणि केळ खायला आवडतं. हा माझ्यासाठी एकदम योग्य नाश्ता आहे.

दुपारच्या जेवणात काय खातो हार्दिक?

दुपारच्या जेवणापूर्वी हार्दिक पंड्या पाण्यातून फिजी अप्पल साइडर विनेगर (-उत) सप्लीमेंट घेतो. ही अशी योजना आहे, ज्यानंतर त्यांना भूक कमी लागतेच पण त्यांचे वजनही नियंत्रणात राहते. हार्दिकचं दुपारचं जेवण हे आरोग्यवर्धक असतं. यात जीरा राईस, पालक आणि डाळ सारखे भोजन खायला आवडतं. त्यात जवळपास ५५० कॅलरीज आणि २४ ग्रॅम प्रोटीन असतं.

रात्रीच्या जेवणात काय असतं?

रात्री प्रॅक्टिस झाल्यावर हार्दिक ओटमील खातो. ज्यात ६०० कॅलरीज आणि २८ ग्रॅम प्रोटीन असतं. त्याचं रात्रीचं जेवण सुद्धा हे दुपारच्या जेवणासारखं असतं. हार्दिक संध्याकाळी आधी पाण्यातून फिजी अप्पल साइडर विनेगर (-उत) सप्लीमेंट घेतो आणि त्यानंतर टोफू आणि ब्राउन राइस सोबत एशियन ग्रीन बाउल खातो. हे त्याच्या दिवसातील शेवटच जेवण असतं. हा डायट प्लेन हार्दिक पंड्याच्या फिटनेसनुसार त्याच्या आहारतज्ञाने लिहून दिलेला आहे. हार्दिक सकाळी उठल्यानंतर ५०० मिलीलीटर पाणी पिऊन स्वतःला हायड्रेट ठेवतो. यामुळे त्याला जिमसाठी ऊर्जा मिळते आणि दिवसाची सुरुवात चांगली होते.

हार्दिकच्या डायटमधील कॅलरीचं प्रमाण खालीलप्रमाणे आहे:
नाश्ता: ६५० कॅलरीज, दुपारचं जेवण: ५५० कॅलरीज, रात्रीचं जेवण: ६०० कॅलरीज

हार्दिकच्या डायटमध्ये प्रोटीनचं प्रमाण खूप विचारपूर्वक ठेवलं आहे: नाश्त्यात: ३० ग्रॅम प्रोटीन, दुपारच्या जेवणात: २४ ग्रॅम प्रोटीन, रात्रीच्या जेवणात: २८ ग्रॅम प्रोटीन

# गुकेशची पाचव्या स्थानी घसरण



**सेंट लुईस (अमेरिका)**-भारताचा जगज्जेता दोम्माराजू गुकेशसाठी ग्रँड बुद्धिबळ दौऱ्याचा भाग असलेल्या सेंट लुईस जलद (रॅपिड) व अतिजलद (ब्लिट्झ) स्पर्धेचा दुसरा दिवस विशेष राहिला नाही. त्याला एका फेरीत पराभूत व्हावे लागले. तर, अन्य दोन फेऱ्यांमध्ये त्याने प्रतिस्पर्धी खेळाडूला बरोबरीत रोखले. या कामगिरीनंतर दहा खेळाडूंचा सहभाग असलेल्या या स्पर्धेत सहा गुणांसह गुकेशची संयुक्तपणे पाचव्या स्थानी घसरण झाली.गुकेशला चौथ्या फेरीत अमेरिकेच्या अखेरच्या स्थानी असणाऱ्या सॅम शँकलँडकडून पराभूत व्हावे लागले. यानंतर फ्रान्सचा मॅक्सिम व्हॅचिएर-लाग्रेव्ह आणि उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोवविरुद्ध त्याने बरोबरीची नोंद केली. यादरम्यान अमेरिकेच्या फॅबियानो कारूआनाने लेव्हॉन ॲरोनियनला नमवीत दोन गुणांची आघाडी मिळवली. गुकेशप्रमाणेच ॲरोनियनला दोन डाव बरोबरीत सोडवता आले आणि एकामध्ये त्याला पराभवाचा सामना करावा लागला.

जलद प्रारूपात आता केवळ तीन फेऱ्या शिल्लक असून फॅबियानो कारूआना १२ पैकी दहा गुणांसह आघाडीवर आहे. ॲरोनियन आठ गुणांसह अमेरिकेचा वेस्ली सो याच्यासह संयुक्तपणे दुसऱ्या स्थानावर आहे. लाग्रेव्ह सात गुणांसह चौथ्या तर, गुकेश व लिनियर डोमिन्गुएज पेरेज संयुक्तपणे पाचव्या स्थानी आहे. उझबेकिस्तानचा नोदिरबेक अब्दुसत्तोरोव आणि व्हिएतनामचा लिएम ले क्वांग पाच गुणांसह संयुक्तपणे सातव्या स्थानावर आहेत. अमेरिकेचा ग्रिगोरी ओपरिन त्यांच्या दोन गुणांनी मागे आहे. सॅम शँकलँडने गुकेशला नमवीत दोन गुणांची कमाई केली. मात्र, तरीही तो अखेरच्या स्थानी कायम आहे.

# रोहित शर्माची लॉटरी... काहीही न करता झाला मोठा फायदा

दुबई-वेस्ट इंडिज आणि पाकिस्तान क्रिकेट संघात झालेल्या वनडे मालिकेनंतर आयसीसी रँकिंगमध्येही बदल झाला आहे. यावेळी विशेष म्हणजे पाकिस्तानचा माजी कर्णधार बाबर आझम याला मोठं नुकसान सहन करावं लागलं आहे, तर भारतीय वनडे संघाचा कर्णधार रोहित शर्माला काहीही न करता दुसऱ्या क्रमांकावर येण्याची संधी मिळाली आहे.शुबमन गिल नंबर वन फलंदाज : आयसीसीनं आज जाहीर केलेल्या ताज्या वनडे क्रमवारीत, भारतीय संघाचा सलामीवीर शुभमन गिल पहिल्या क्रमांकावर कायम आहे. शुभमन गिलचं रेटिंग सध्या ७८४ आहे. गिलनं काही काळापासून एकही वनडे सामना खेळला नसला तरी, त्यानंतरही त्याच्या स्थानाला कोणताही धोका नाही. दरम्यान, भारतीय संघाचा वनडे कर्णधार रोहित शर्मा आता दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. त्याचं रेटिंग ७५६ आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीनंतर टीम इंडियानं एकही वनडे सामना खेळलेला नाही. दरम्यान, रोहित शर्मालाही न खेळता फायदा झाला आहे, याचं कारण बाबर आझम आहे. विशेष म्हणजे रोहित शर्मानं ९ मार्च २०२५ रोजी न्यूझीलंडविरुद्ध शेवटचा वनडे सामना खेळला.

बाबर आझमला एक स्थानाचं नुकसान : खरं तर बाबर आझम मागील क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर होता, पण वेस्ट इंडिजविरुद्धच्या वनडे मालिकेत बाबर आझमची कामगिरी खूपच खराब होती. यानंतर बाबर आझमची सरासरी खाली घसरली. त्यासोबतच तो क्रमवारीतही खाली आला आहे. बाबर आझमचं रेटिंग आता ७५१ वर आलं आहे. जर बाबर असाच खेळत राहिला तर विराट कोहली देखील त्याला मागे टाकेल, जो सध्या चौथ्या क्रमांकावर आहे.इतर फलंदाजांच्या क्रमवारीत कोणताही बदल नाही : जर आपण या टॉप ३ संघांना सोडलं तर विराट कोहली चौथ्या क्रमांकावर आहे, ज्याचं रेटिंग सध्या ७३६ आहे. डॅरिल मिशेल पाचव्या क्रमांकावर आहे आणि चरिथ अस्लंका सहाव्या क्रमांकावर आहे. आयर्लंडचा हॅरी टेक्टर सातव्या क्रमांकावर आहे आणि भारताचा श्रेयस अय्यर आठव्या क्रमांकावर आहे. अफगाणिस्तानचा इब्राहिम झद्रान नवव्या क्रमांकावर आहे, तर श्रीलंकेचा कुसल मेंडिस दहाव्या क्रमांकावर आहे. याचा अर्थ बाबर आझम आणि रोहित शर्मा व्यतिरिक्त, टॉप १० मधील कोणाच्याही क्रमवारीत कोणताही बदल झालेला नाही.

# यंदाच्या जागतिक स्पर्धेसाठी आव्हानात्मक कार्यक्रमपत्रिका



पॅरिस : यंदाच्या हंगामात सातत्य राखण्याच्या आव्हानाचा सामना करणाऱ्या भारतीय बॅडमिंटनपटूंचा २५ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील मार्ग अडथळ्याचा राहणार आहे. या स्पर्धेसाठी बुधवारी कार्यक्रमपत्रिका काढण्यात आली, तेव्हा भारतीय बॅडमिंटनपटूंसमोर सुरुवातीपासून कठीण आव्हान राहणार आहे. पुरुष एकेरीत भारताच्या लक्ष्य सेनची पहिल्याच फेरीत जागितक क्रमवारीत पहिल्या स्थानावर असलेल्या चीनच्या शी यू क्यू याच्याशी गाठ पडणार आहे. पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत उपांत्य फेरीत पराभूत झाल्यानंतर लक्ष्यला पूर्ण हंगामात संघर्षाचाच सामना करावा लागला आहे. लक्ष्य सध्या जागतिक क्रमवारीत २१व्या स्थानावर आहे.

एकेरीतील दुसरा खेळाडू एचएस प्रणॉयला पहिल्या फेरीत फिनलँडच्या जोकिम ओलडॉर्फ या दुबळ्या प्रतिस्पर्ध्याशी खेळायचे आहे. अर्थात, हा अडथळा पार केल्यावर दुसऱ्या फेरीत त्याच्यासमोर जागतिक क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर असलेल्या डेन्मार्कच्या अँडर्स अँटोनसेनचे आव्हान असू शकते.महिला एकेरीत पीव्ही सिंधूलादेखील पहिल्या फेरीत आव्हान नसेल. तिची गाठ बल्गेरियाच्या कालोयाना नालबांटोवाविरुद्ध होईल. पण, दुसऱ्या फेरीत तिला जागतिक क्रमवारीतील दुसऱ्या स्थानावर असलेल्या चीनच्या वांग झी यी हिचे आव्हान अपेक्षित आहे.

पुरुष दुहेरीत सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी जोडीला पहिल्या फेरीत पुढे चाल आहे. दुसऱ्या फेरीत त्यांचा सामना मलेशियाच्या हरिहरन अम्साकारुनन-रुबेन कुमार किंवा तैवानच्या लिऊ कुआंग हेंग- यांग पो हान यांच्यातील विजेत्याशी होईल. भारतीय जोडीची आगेकूच कायम राहिल्यास उपांत्यपूर्व फेरीत त्यांच्यासमोर मलेशियाच्या आरोन चिया-सोह वुई यिक यांचे आव्हान असू शकते. अर्थात, आतापर्यंत भारतीय जोडीने या जोडीविरुद्ध झालेल्या १४ पैकी ११

# बड्या उद्योगपतीच्या घराण्याची लेक सचिन तेंडुलकरांची सून होणार



मुंबई : टीम इंडियाचा माजी कॅप्टन आणि मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा लेक अर्जुन तेंडुलकरचा साखरपुडा झाला आहे. अर्जुन तेंडुलकरचं लग्न सानिया चांडोक हिच्यासोबत ठरल्याचं वृत्त काही इंग्रजी आणि हिंदी माध्यमांनी दिलं आहे. सानिया चांडोक ही मुंबईतील उद्योगपती रवि घई यांची नात आहे. अर्जुन आणि सानिया यांचा साखरपुडा एका खासगी समारंभात झाला. हा साखरपुडा दोन्ही कुटुंबांचे जवळचे लोक आणि मित्रांच्या उपस्थितीत पार पडला. घई कुटुंब मुंबईतील नामांकित उद्योजक आहे. इंटरकॉन्टिनेंटल मरीन ड्राइव्ह हॉटेल आणि ब्रुकलिन क्रीमरी या आयसक्रीम ब्रँडची मालकी घई कुटुंबाकडे आहे.

अर्जुन तेंडुलकर देशांतर्गत क्रिकेटमध्ये गोवा संघाकडून खेळतो. तर आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सकडून खेळतो. मुंबईकडून त्यानं २०२०-२१ मध्ये करिअरला मुंबईकडून सुरुवात केली होती. हरियाणा विरुद्ध टी २० सामन्यात त्यानं पदार्पण केलं होतं. मुंबईकडून खेळण्यापूर्वी अंडर १९ क्रिकेटमध्ये अर्जुन तेंडुलकरनं भारतीय संघाकडून क्रिकेट खेळलं होतं.

सानिया चांडोक कोण आहे?

मुंबईतील प्रसिद्ध उद्योजक रवी घई यांची सानिया चांडोक नात आहे. घई कुटुंब हॉस्पिटलिटी आणि अन्न उद्योगात कार्यरत आहे. भारत सरकारच्या कॉर्पोरेट अफेअर्सच्या माहितीनुसार सानिया चांडोक ही डेसिगन्टेड पार्टनर आणि संचालक म्हणून ची.झ्रुी झशीं डरि रपव डींश ङ्ङझ कार्यरत आहे. रवी इक्बाल घई हे मुंबईतील उद्योग जगामधील आघाडीचं नाव आहे. ते ग्राविस हॉस्पिटलिटी लिमिटेडचे चेअरमन आहेत.

अर्जुन तेंडुलकरची कारकीर्द

अर्जुन तेंडुलकरनं आतापर्यंत १७ प्रथमश्रेणी सामने, १८ लिस्ट ए आणि २४ टी २० सामने खेळले आहेत. प्रथम श्रेणी सामन्यामध्ये अर्जुन तेंडुलकरनं ३३.५१ च्या सरासरीनं ३७ विकेट घेतल्या आहेत. तर, २३.१३ च्या सरासरीनं ५३२ धावा केल्या आहेत. लिस्ट ए मध्ये अर्जुनच्या नावावर २५ विकेट आहेत तर त्यानं १०२ धावा केल्या आहेत. टी २० क्रिकेटमध्ये अर्जुन तेंडुलकरनं २७ विकेट घेतल्या आहेत. तर, ११९ धावा केल्या आहेत. अर्जुन तेंडुलकर सध्या गोवा संघाकडून खेळतो. आयपीएलमध्ये अर्जुन तेंडुलकर यानं मुंबई इंडियन्सकडून ५ सामने खेळले असून त्यानं ३ विकेट घेतल्या आहेत. तर, त्याच्या नावावर १३ धावा आहेत.

दरम्यान, सचिन तेंडुलकर आणि अंजली तेंडुलकर यांचं लग्न २४ मे १९९५ रोजी झालं होतं. अंजली तेंडुलकर सचिन पेक्षा ६ वर्षांनी मोठी आहे. सचिन तेंडुलकर आणि अंजली तेंडुलकरची मुलगी सारा तेंडुलकर हिचा जन्म १२ ऑक्टोबर १९९७ तर अर्जुन तेंडुलकरचा जन्म २४ सप्टेंबर १९९९ ला झाला आहे.

# पानगाव सोसायटीच्या नवनिर्वाचित भाजपा संचालकाचे भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून अभिनंदन

**लातूर/प्रतिनिधी :** रेणापूर तालुक्यातील मौजे पानगाव येथील सेवा सहकारी सोसायटीच्या निवडणुकीत घवघवीत यश संपादन केलेल्या भाजपाच्या नवनिर्वाचित सर्व नऊ संचालकांचे भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी सत्कार करून अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

पानगाव सेवा सहकारी सोसायटीच्या निवडणुकीत भाजपाच्या नेतृत्वातील पॅनलने दणदणीत विजय प्राप्त केला आहे. भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात मंगळवारी दुपारी पानगाव सोसायटीचे नवनिर्वाचित संचालक विद्यमान चेअरमन गणेश वांगे, धर्मराज बरुळे, शेषेराव हानवते, अविनाश मोटाडे, मुरलीधर डोने, ज्ञानेश्वर संपत्ते, सुधाकर फुले, दीपक पेदे, किशोर हरिदास यांचा सत्कार करून अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना आ. कराड म्हणाले की, स्वर्गीय मुंडे साहेबांनी रेणापूर, पानगाव भागाचे नेतृत्व केले आता या भागाची सेवा करण्याची मला संधी मिळाली हे माझे भाग्य असून या भागासाठी जे जे करणे शक्य आहे ते करण्याचा माझा प्रयत्न असून महिनाभरात पानगावच्या ग्रामीण रुग्णालयास मंजुरी मिळेल, पानगाव पोलीस स्टेशनचा प्रस्ताव शासन दरबारी आहे त्यासही लवकरच मंजुरी मिळेल असे सांगून तुमच्या मनातील विकासाच्या संकल्पना निश्चितपणे पूर्ण करणार असल्याचे बोलून दाखवले.






शेतकऱ्यांना सोसायटीच्या माध्यमातून मदत करावी अशी सूचना करून आ. रमेशआप्पा कराड यांनी जिल्हा बँकेने जाहीर केल्याप्रमाणे किती जणांना बिनव्याजी पाच लाखाचे कर्ज मिळाले असा प्रश्न उपस्थित केला. खोटी आश्वासने देऊन वर्षानुवर्ष सत्ता उपभोगणाऱ्या काँग्रेसवाल्यांना प्रत्येक निवडणुकीत त्यांना त्यांची जागा दाखवून दिली पाहिजे. जनतेनी पानगावातील काँग्रेसच्या पुढाऱ्यांना घरी बसवले. जनतेतून संपलेले पुढारी बाहेर येणार नाहीत याची सर्वांनी काळजी घ्यावी असेही त्यांनी बोलून दाखविले.

प्रारंभी ज्येष्ठ नागरिक दत्ता कुलकर्णी आणि गोपाळ शेंडगे यांनी निवडून आलेला हा पॅनल भाजपचाच आहे काहींनी जाणीवपूर्वक सोशल मीडियातून श्रेय घेण्याचा प्रयत्न केला असला तरी त्यात कसलेही तथ्य नाही असे सांगून पानगावच्या विकासासाठी आमदार साहेबांनी लक्ष घालावे असे बोलून दाखवले.

सोसायटीचे चेअरमन गणेश वांगे यांनी यावेळी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. प्रारंभी ज्येष्ठ नागरिकासह भाजपा पदाधिकाऱ्यांनी आ. रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार केला. शेवटी ईश्वर गुडे यांनी आभार मानले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले. यावेळी भाजपाचे शहराध्यक्ष गणेश तुरुप यांच्यासह श्रीराम हरिदास, ज्ञानोबा फुले, दत्ता कस्तुरे, बाबुराव भंडारे, बाबुराव हरिदास, दिलीपराव शेंडगे, शिवलिंगआप्पा हलकुडे, दत्ता डोने, धोंडीराम हलकुडे, शिवाजी शेंडगे, बसवेश्वर स्वामी, रामेश्वर हलकुडे, कचरू उकरले, सतीश कुलकर्णी, मारुती गालफाडे, रमाकांत संपत्ते, गोविंद दुट्टे, आरूप कुलकर्णी, अविनाश मोटाडे, दिनेश भंडारे, बालाजी मुच्चे, गुंडेराव तुरूप, वामनराव संपत्ते, लक्ष्मण कावडे, शेषेराव कुलकर्णी, सतीश कुलकर्णी, अभिमान संपत्ते, सचिन भंडारे, भारत संपते, वासोकोदिन सिद्दिकी, दत्तात्रय भंडारे, सतीश फुलारी, नादरखॉं पठाण, राजेश पाठक यांच्यासह अनेक जण होते.

## दयानंद वाणिज्य मध्ये ग्रंथ प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाच्या वतीने भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त १२ व १३ ऑगस्ट रोजी निवडक ग्रंथांचे प्रदर्शन भरविण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन सुप्रसिद्ध कवी, गझलकार व वाङ्मयीन अभ्यासक तसेच यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई येथील इंग्रजी विभागप्रमुख प्रा. डॉ. मुकुंद राजपंखे यांच्या हस्ते झाले. प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी लिहलेल्या उत्कृष्ट ग्रंथ वाचक स्पर्धेतील अभिप्राय तसेच उत्कृष्ट ग्रंथ परीक्षण, साहित्य, इतिहास, वाणिज्य, व्यवस्थापन, तंत्रज्ञान, आणि चरित्रविषयक संदर्भग्रंथांचा समावेश होता. विद्यार्थी, प्राध्यापक आणि वाचनप्रेमी यांनी उत्साहाने या ग्रंथप्रदर्शनाला भेट देऊन विविध विषयांवरील पुस्तकांचे अवलोकन केले. प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी.टी. चव्हाण, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनीषा आष्टेकर यांची उपस्थिती होती. प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी ग्रंथालय लिपिक लक्ष्मीकांत वाघ, सौ. गीता चौधरी, शेख, विशाल कांबळे, शैलेश काळे, ओम राठोड या सर्व कर्मचाऱ्यांनी प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# राज्यातील घरगुती वीज ग्राहकांनी ओलांडला एक हजार मेगावॅट वीजनिर्मिती क्षमतेचा टप्पा

### – लातूर परिमंडळातील ११ हजार २६१ वीजग्राहकांचा समावेश
### – स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला सूर्यघर मोफत वीज योजनेतील यशस्वी कामगिरी

**लातूर/प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळावे यासाठी सुरू केलेल्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीत महावितरणने यशस्वी कामगिरी केली आहे. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला या योजनेच्या अंतर्गत घरगुती ग्राहकांच्या छतावरील सौर ऊर्जानिर्मिती क्षमतेने एक हजार मेगावॅटचा टप्पा ओलांडला. या यशाबद्दल महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी वीज ग्राहकांचे, महावितरणचे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे तसेच छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविणाऱ्या पुरवठादारांचे अभिनंदन केले आहे.

मा. पंतप्रधानांनी सुरू केलेल्या या योजनेचा घरगुती ग्राहकांना थेट लाभ असल्याने योजनेच्या अंमलबजावणीवर भर देण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. महावितरण राज्यात या योजनेची अंमलबजावणी करत आहे. केंद्र सरकारने फेब्रुवारी २०२४ मध्ये सुरू केलेल्या या योजनेत गेल्या दीड वर्षात छतावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविणाऱ्या राज्यातील ग्राहकांची संख्या अडीच लाखापेक्षा अधिक झाली असून त्यांची एकत्रित क्षमता एक हजार मेगावॅट अर्थात एक गिगावॅट झाली आहे. या ग्राहकांना केंद्र सरकारकडून १८७० कोटी रुपये अनुदान मंजूर झाले.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र हे आघाडीचे राज्य ठरले आहे. योजनेच्या अंमलबजावणीत ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. १५ ऑगस्ट अर्थात स्वातंत्र्यदिनी देशभर सौर ऊर्जेच्या वापराबाबत जागृती करण्यात येणार असून त्याच वेळी राज्यातील वीज ग्राहकांनी छतावरील सौर ऊर्जानिर्मितीच्या बाबतीत एक हजार मेगावॅटचा टप्पा ओलांडला आहे.

छतावर सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविण्याच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीत राज्यात नागपूर जिल्ह्याने ४०,१५२ लाभार्थी ग्राहक आणि १५७ मेगावॅट क्षमतेसह प्रथम क्रमांक मिळविला आहे. नागपूर जिल्ह्यापाठोपाठ पुणे (१९,१९५ ग्राहक व ८९ मेगावॅट क्षमता), जळगाव (१८,८९२ ग्राहक व ७० मेगावॅट क्षमता), अमरावती (१५,२४५ ग्राहक व ६३ मेगावॅट क्षमता), छत्रपती संभाजीनगर (१६,६६४ ग्राहक, ५९ मेगावॅट क्षमता) व नाशिक (१५,४६८ ग्राहक, ५५ मेगावॅट क्षमता) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. तर लातूर (६३७१ ग्राहक, २५ मेगावॅट क्षमता ) बीड (३१७७ ग्राहक, ११.९४ मेगावॅट क्षमता ) तसेच धाराशिव (१७१३ ग्राहक, ६.२३ मेगावॅट क्षमता ) या जिल्हयांचा समावेश समावेश आहे.

**योजनेचा असा लाभ घ्या**

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या लाभार्थ्यांनी राज्यात एक हजार मेगावॅट क्षमतेचा टप्पा ओलांडला असून अन्य घरगुती वीज ग्राहकांनी आणि गृहनिर्माण संस्थांनीही या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले.

योजनेचा लाभ घेण्यासाठी https://pmsuryaghar.gov.in या वेबसाईटवर नोंदणी करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी ग्राहक महावितरणच्या कार्यालयात संपर्क साधू शकतात. छतावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविण्यासाठी केंद्र सरकारकडून ग्राहकांना थेट अनुदान मिळते. एक किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पाला तीस हजार रुपये, दोन किलोवॅटला साठ हजार रुपये तर तीन किलोवॅटला ७८ हजार रुपये अनुदान मिळते. गृहनिर्माण संस्थांनाही पाचशे किलोवॅटपर्यंत प्रती किलोवॅट १८ हजार रुपये अनुदान मिळते. छतावर बसविलेल्या सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पातून पुढे २५ वर्षे वीजनिर्मिती होते. या वीजनिर्मितीमुळे ग्राहकाची घरगुती गरज पूर्ण होते व अतिरिक्त वीज महावितरणला विकता येते.

# जलसमृद्ध औसा अभियानाला लोकसहभाग मिळाल्यास अभियान देशाला दिशादर्शक ठरेल – पद्मश्री पोपटराव पवार

## जलसमृद्ध औसा अभियानाचा जनसंकल्प मेळावा संपन्न

**औसा/प्रतिनिधी :** शेतरस्तेसंदर्भात आमदार अभिमन्यू पवार यांनी केलेले काम कौतुकास्पद आहे. शेतरस्ते सारखे अवघड काम त्यांनी यशस्वीपणे मतदारसंघात करून दाखवले आता पाण्यावर काम करण्याची तयारी सुरू केली आहे गेल्या पंचवीस वर्षांत आपण जो पाण्याचा उपसा केला आहे. तो भरून नाही काढला तर आपल्याला दुष्काळाला सामोरे जावे लागणार आहे. ते आशा अभियानातून भरून काढले पाहिजे पाण्यावर काम करणे आव्हानात्मक आहे. पण या कामाला लोकसहभागाची जोड मिळाली तर देशाला दिशादर्शक काम ठरू शकते असे प्रतिपादन पद्मश्री पोपटराव पवार यांनी केले आहे.

आमदार अभिमन्यू पवार यांच्या संकल्पनेतून व क्रिएटीव्ह फाऊंडेशन यांच्या पुढाकाराने औसा येथे (दि १३) ऑगस्ट रोजी जलसमृद्ध औसा अभियानाचा जनसंकल्प मेळावा आयोजित ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर आमदार अभिमन्यू पवार, माजी न्यायमूर्ती अंबादास जोशी, पोलीस प्राधिकरणचे उमाकांत मिटकर, उद्योजक कौशिक कोठिया, प्रगतशील शेतकरी सीताराम जाधव, माजी कुलगुरू डॉ अशोक ढवण, क्रिएटीव्ह फाऊंडेशन चे अध्यक्ष ॲड परिक्षीत अभिमन्यू पवार, उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, गटविकास अधिकारी आनंद मिरगळे, सुभाष जाधव, किरण उटगे, सभापती चंद्रशेखर सोनवणे, उपसभापती प्रा भिमाशंकर राचट्टे, प्रा सुधीर पोतदार, शिव मुरगे, सुनील उटगे, कल्पना डांगे, धनराज परसने, ऋषाल देशमूख, रवी चिलमे, परमेश्वर धुमाळ आदी उपस्थित होते. यावेळी पद्मश्री पोपटराव पवार बोलत होते की राजकारणात संस्कार असलेली माणसे असतील तर त्यांचा समाजाबद्दलचा हेतू सरळ असतो आणि तो आमदार अभिमन्यू पवार यांच्या शेतरस्ते कामातून स्पष्ट दिसतो त्यामुळे त्यांना संस्कार सम्राट आमदार म्हणले पाहिजे. शेतरस्त्यांसारखे किचकट काम त्यांनी करून दाखविले एखाद्या प्रयोगात आपण यशस्वी झालो, तर त्या कामाचं सर्व स्तरांवरून कौतुक होतं. त्याला मानसन्मानही मिळतात, परंतु तो प्रयोग यशस्वी होण्यामागं अनेक लोकांचं सकारात्मक योगदान असतं. त्यानंतरच नावीन्यपूर्ण प्रयोग पूर्णत्वास जातात. असाच सहभाग लोकांचा पाण्याच्या कामात राहिला तर हे कामही सहज होवून जावू शकते हे काम समाजाचे काम आहे. पुढच्या पिढीच्या भविष्याच्या दृष्टीने महत्त्वाचे काम आहे. हिवरेबाजार हे आदर्श गाव लोकसहभागाचा उत्तम नमुना आहे. असे सांगून त्यांनी विलासराव देशमुख, गोपीनाथ मुंडे व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कामाचा ऊहापोह करीत दिवंगत नेते विलासराव देशमुख व गोपीनाथ मुंडे हे मराठवाड्याचे भविष्य होते त्यांच्या अकाली मृत्यूने मरावाडयाचे मोठे नुकसान झाले असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपक चाबुकस्वार यांनी केले. यावेळी योगेश्वर उद्योग समुहाच्या वतीने यावेळी २० लाख रुपयांचा धनादेश या कामासाठी सुपुर्द करण्यात आला.

**दुष्काळग्रस्त कलंक पुसण्यासाठी लोकसहभागाची गरज – आ पवार**

औसा तालुका हा दुष्काळग्रस्त म्हणून ओळखला जातो मराठवाड्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या या तालुक्यात झाल्या आहेत. त्यामुळे येथे पाण्यावर काम होणे आवश्यक आहे. आपण आमदार झाल्यानंतर रस्ता, वीज व पाणी यावर काम करण्याचा संकल्प केला त्याचीच सुरुवात म्हणून शेत




तिथे रस्ता अभियानाअंतर्गत तेराशे किलोमीटर पेक्षा अधिक लाबींचे शेतरस्ते तयार केले या कामासाठी धोरणात्मक सुधारणा व महसूली अधिनियमात बदल केले. तर शेतकऱ्यांना उच्च दाबाने विद्युत पुरवठा होण्यासाठी मतदारसंघात नवीन ११ वीज उपकेंद्र उभारणीचे काम सुरू केले याचबरोबर रोहित्री क्षमता वाढ करून पुढील पंचवीस वर्षे वीजेचा प्रश्न निर्माण होणार नाही अशी व्यवस्था तयार करीत आहोतच भविष्यात दुष्काळाची वेळ येऊ नये यासाठी उपाययोजना करण्याची गरज आहे. यासाठी औसा पाणीदार करण्याच्या दृष्टीने काम करण्याची गरज आहे.यासाठी जलसमृद्ध औसा अभियान हाती घेण्यात आले असून यासाठी लोकसभाची गरज असल्याचे आमदार अभिमन्यू पवार यांनी सांगितले.

**लोकांचा प्रतिसाद.. त्या गावाला अगोदर संधी – ॲड परिक्षीत पवार**

राजमाता जिजाऊ शाळा माझी न्यारी उपक्रमाअंतर्गत जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे धोरण आखून मतदारसंघातील शाळांमध्ये अद्ययावत सुविधा आपण उपलब्ध करून दिल्या आहेत. याच धर्तीवर आपण जलसमृद्ध औसा अभियान उभे करणार असून हे अविरत दहा वर्ष चालणारे काम आहे. आपण टप्प्या टप्प्यात गावे समाविष्ठ करून या योजनेअंतर्गत कामे पूर्ण करणार आहोत. यावेळी ज्या गावांमध्ये कामाला संधी व लोकांचा सहभाग अधिक दिसेल त्या गावाला पसंती दिली जाईल.

# १५ ऑगस्ट पासून प्रायोगिक आधारावर १६३४५/१६३४६ लोकमान्य टिळक टर्मिनस- तिरुवनंतपुरम- लोकमान्य टिळक टर्मिनस नेत्रावती एक्सप्रेसला राजापूर रोड स्टेशनवर थांबा

**मुंबई/प्रतिनिधी :** रेल्वे १५.०८.२०२५ पासून प्रायोगिक आधारावर १६३४५/१६३४६ लोकमान्य टिळक टर्मिनस– तिरुवनंतपुरम– लोकमान्य टिळक टर्मिनस नेत्रावती एक्सप्रेसला राजापूर रोड स्टेशनवर थांबा देण्याचा निर्णय घेतला आहे.

रेल्वे १५.०८.२०२५ पासून प्रायोगिक आधारावर १६३४५/१६३४६ लोकमान्य टिळक टर्मिनस– तिरुवनंतपुरम– लोकमान्य टिळक टर्मिनस नेत्रावती एक्सप्रेसला राजापूर रोड स्टेशनवर २ मिनिटांचा थांबा देण्याचा निर्णय घेतला आहे.

तपशील खालीलप्रमाणे:

१६३४५ लोकमान्य टिळक टर्मिनस - तिरुवनंतपुरम नेत्रावती एक्सप्रेस राजापूर रोड स्टेशनवर १९.४० वाजता पोहोचेल आणि १९:४२ वाजता निघेल. (पावसाळी वेळापत्रक)



१६३४६ तिरुवनंतपुरम - लोकमान्य टिळक टर्मिनस नेत्रावती एक्सप्रेस राजापूर रोड स्टेशनवर ०७:३८ वाजता पोहोचेल आणि ०७:४० वाजता निघेल. (पावसाळी वेळापत्रक) पावसाळी कालावधीनंतरच्या वेळा नंतर शेअर केल्या जातील.

या गाड्यांच्या थांब्यांच्या तपशीलवार वेळेसाठी कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा NTES ॲप डाउनलोड करा. प्रवाशांनी कृपया नोंद घ्यावी आणि सुविधेचा लाभ घ्यावा अशी विनंती आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे–भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# मोहीम: पोलिस बंदोबस्तात हटवली १४३ अतिक्रमणे, रुंदीकरण होणार सुलभ



धाराशिव (प्रतिनिधी) – शहरातील राजमाता जिजाऊ चौक ते सांजा चौक परिसरातील अतिक्रमण हटवण्याची मोहीम सार्वजनिक बांधकाम विभागाने सोमवारपासून हाती घेतली आहे. नोटीसा बजावूनही अनेकांनी अतिक्रमणे काढली नव्हती. मंगळवारी (दि.१२) सकाळी पोलिस बंदोबस्तात बांधकाम विभागाने दोन जेसीबीच्या मदतीने अतिक्रमणांवर हातोडा चालवला. पहिल्याच दिवशी जिजाऊ चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौका दरम्यानच्या रोडवरील १४३ अतिक्रणे हटवण्यात आली.

शहरातून बार्शी–बोरफळ राज्यमार्ग गेला आहे. या मार्गावर शहरातील जिजाऊ चौक ते सांजा चौकादरम्यान दोन्ही बाजूंनी अतिक्रमणे झाली आहेत. अनेकांनी पक्की बांधकामेही थाटली आहेत. काही जणांनी व्यवसायासाठी पत्रा शेड उभारले होते. तर काहींनी पानटपऱ्या थाटल्या आहेत. अपुऱ्या रस्त्यामुळे वाहने चालवताना अडचण कसरत करावी लागत होती तर पादचाऱ्यांना जीव मुठीत घेऊन चालावे लागत होते. त्यामुळे अपघातांचा धोका वाढला होता. वारंवार सूचनाही देऊनही अतिक्रमणे हटवली जात नव्हती. सार्वजनिक बांधकाम विभागाने १४३ अतिक्रमणधारकांना रोडवरील अतिक्रमण हटवण्याबाबत नोटिसा बजावल्या होत्या. काही व्यावसायिक, व्यापाऱ्यांनी सोमवारी अतिक्रमण काढले होते. मात्र, काहींचे कायम होते. त्यामुळे मंगळवारी सार्वजनिक बांधकाम विभागाने पोलिस बंदोबस्तात अतिक्रमणांवर बुलडोझर चालवला. यामुळे रस्त्याने मोकळा श्वास घेतला. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी तात्पुरते व पक्क्या स्वरूपाचे शेड, दुकाने व्यापारी व व्यावसायिकांनी उभारली आहेत. मंगळवारी अतिक्रमण हटवण्याची कारवाई पाहून अनेक दुकानदारांनी पत्रे, शेड, लोखंडी अँगल काढून घेतले. जेसीबीमुळे साहित्याचे नुकसान होऊ नये, यासाठी व्यावसायिक, विक्रेत्यांची धावपळ उडाली. अतिक्रमण हटाव पथकाने मंगळवारी सकाळपासून रस्ता दुभाजकापासून दोन्ही बाजूंचे १२ मीटर अंतर मोजून खुणा केल्या. १२ मीटरच्या आत दुकानांसमोरील कट्टे, शेड, साहित्य असलेले काढून घेण्यास सांगण्यात येत होते.

# शक्तीपीठ महामार्ग महाळंगीत शंभर टक्के मोजणी पूर्ण: नऊ हेक्टर ४० आर क्षेत्र होणार संपादीत



धाराशिव,(प्रतिनिधी)–शक्तीपीठ महामार्गाच्या मोजणीविरोधात शेतकरी संघटना व स्थानिक शेतकर्यांनी आक्रमक भूमिका घेतलेली असतानाच धाराशिव जिल्ह्यातील महाळंगी गावात मोजणीचा टप्पा १०० टक्के पूर्ण झाला आहे. जिल्ह्यातील १३ गटधारक शेतकर्यांनी शक्तीपीठ महामार्गासाठी स्वेच्छेने आपली जमीन देण्यास संमती दिली होती. महाळंगी शिवारातील नऊ हेक्टर ४० आर एवढे क्षेत्र शक्तीपीठ महामार्गासाठी संपादीत केले जाणार आहे. या संपूर्ण क्षेत्राची मोजणी मंगळवारी जिल्हा प्रशासनाने पूर्ण केली आहे.

नागपूर–गोवा या ८०२ किलोमीटर लांबीच्या शक्तीपीठ महामार्गासाठी आठ हजार ६१५ हेक्टर जमीन लागणार आहे. त्यापैकी आठ हजार १४९ हेक्टर जमीन खाजगी मालकीची आहे. कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातून होत असलेल्या विरोधाच्या पार्श्वभूमीवर धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी आणि शेतकरी संघटनांनी महामार्गाच्या मोजणी प्रक्रियेला विरोध केला होता. दुसरीकडे स्वेच्छेने जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना बाजारभावाव्यतिरिक्त २५ टक्के अतिरिक्त बोनस देण्याची शिफारस कोल्हापूरचे आमदार राजेश क्षीरसागर यांनी मुख्यमंत्र्यांकडे केल्यानंतर जिल्ह्यातील काही गावांमधून शक्तीपीठ महामार्गासाठी शेतकऱ्यांचा होकार मिळत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

धाराशिव जिल्ह्यातील धाराशिव आणि तुळजापूर या दोन तालुक्यांतील १९ गावांतील ४६८ हेक्टर जमिनीचे भूसंपादन या महामार्गासाठी केले जाणार आहे. यात धाराशिव तालुक्यातील १७ आणि तुळजापूर तालुक्यातील दोन गावांचा समावेश आहे. यात नितळी गावातील ७९ गटधारक शेतकर्यांकडून ५५ हेक्टर, चिखली गावातील ९४ गटधारक शेतकऱ्यांकडून ४७ हेक्टर तर तुळजापूर तालुक्यातील खुंटेवाडी या गावातील ४९ गटधारक शेतकऱ्यांकडून ४९.६६ हेक्टर जमीन संपादित केली जाणार आहे. या तिन्ही गावात मोठ्या प्रमाणात जमिनीचे भूसंपादन होणार असल्यामुळे मोठ्या संख्येने शेतकरी भूमिहीन होणार आहेत.

त्यामुळे शेतकऱ्यांचा या महामार्गाला मोठा विरोध आहे. असे असतानाही धाराशिव तालुक्यातील महाळंगी गावातील १३ गटधारक शेतकऱ्यांनी स्वेच्छेने आपली जमीन देण्यास जिल्हा प्रशासनाकडे संमती दिली होती. त्यानुसार महाळंगी शिवारात मंगळवारी धाराशिवचे उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख, उपअधीक्षक भूमि अभिलेख मोरे यांच्या उपस्थितीत १०० टक्के मोजणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. चावडीवर मोजणीपत्रकाचे शेतकर्यांसमोर जाहीर वाचनही करण्यात आले. त्यानुसार महाळंगी येथील ९ हेक्टर ४० आर एवढे क्षेत्र शक्तिपीठ महामार्गासाठी संपादित केले जाणार आहे.

# पत्नीच्या नांदण्याच्या कारणावरुन मारहाण: पोलिसात गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)– ढोकी पोलीस ठाणे अंतर्गत संदीपान, विशाल दोघे रा. दाउतपुर, चांगदेव रा. लातुर, हनुमंत, केशरबाई रा. धाराशिव,बाळासाहेब थोरात, ज्ञानेश्वर , सखुबाई रे, तिघे रा. दाउतपुर, संपत्ती, श्रीमंत दोघे रा. येळी ता. औसा जि. लातुर यांनी दि.११.०८.२०२५ रोजी दाउतपुर येथे फिर्यादी नामे–भावेश भास्कर गडदे, वय २६ वर्षे, रा.दाउतपुर ता. जि. धाराशिव यांना त्यांचे कुटुंबाला नमुद व्यक्तींनी फिर्यादीच्या पत्नीच्या नांदण्याच्या कारणावरुन गैरकायद्याची मंडळी जमवून शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, मारहाण करुन जखमी केले. जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे–भावेश गडदे यांनी दि.१२.०८.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे ढोकी येथे भा.न्या.सं.कलम १८९(१),१८९(२), १९१(१), १९१(२), १९०, ३५२, ३५१(२), ३५१(३) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# आविनाश चौधरी मित्र मंडळ व ऑल इंडिया पयाम–ए–इंसानियत फोरम यूनिटचे रक्तदान शिबिर

धाराशिव :– शहरातील उद्योजक आविनाश चौधरी यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त शासकिय रक्त संक्रमण विभागात दरवर्षी प्रमाणे याही वर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते यात त्यांच्या मित्र मंडळाकडुन पंचवीस रक्तदात्यांनी रक्तदान करुन समाजासमोर आदर्श निर्माण केला,या मानव हिताच्या कार्यात त्यांनी रक्तदान करुन अनेकांना जीवनदान देण्याचा प्रयत्न केला.

तसेच ऑल इंडिया पयाम–ए–इंसानियत फोरम युनिट च्या वतीने देखील सामाजिक बांधिलकी म्हणून रक्तदान शिबीर घेण्यात आले,यात पंधरा रक्तदात्यांनी रक्तदान केले,–खझखत्र च्या वतीने राबविण्यात येणारे




मानवहित कार्य हे कौतुकास्पद असुन गरजवंताला अन्नधान्य किट,शासकीय रुग्णालयात नाश्ता,शाळा कॉलेजात निबंध स्पर्धेचे आयोजन,वृध्दांसाठी त्यांच्या घरी जाऊन त्यांच्याशी वेळ काढुन गप्पा मारणे,अनाथाश्रमात जाऊन फळे वाटप करुन विविध विषयांवर चर्चा करणे,आरोग्य शिबिर, नशा मुक्तीसाठी कार्यक्रम राबविणे,अशा प्रकारचे सामाजिक कार्य फोरमच्या माध्यमातून चालू आहेत,ऑल इंडिया पयाम–ए–इंसानियत फोरम हे हजरत मौलाना अलीमिया नदवी साहेब यांनी सन १९७४ मध्ये स्थापना केली तेव्हा पासून आतापर्यंत हे कार्य भारतात चालत असुन पुर्ण देशात ३५० हुन जास्त ग्रुप काम करतात तर अध्यक्ष हाफिज उमर खान यांच्या मार्गदर्शनाखाली धाराशिव येथे कार्य चालू आहे.

रक्तदान शिबिराचे आयोजक आविनाश चौधरी मित्र मंडळातील रक्तदाते व ऑल इंडिया पयाम–ए–इंसानियत फोरम उस्मानाबाद यूनिटचे रक्तदाते यांचा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय धाराशिव सुरक्षा समितीच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला व शुभेच्छा देण्यात आल्या, यावेळी सुरक्षा समिती सदस्य अब्दुल लतीफ,गणेश वाघमारे,आरोग्य मित्र शेख रौफ ब्रदर,डॉ.विवेक कोळगे, सुपरवायझर विठ्ठल कांबळे, गणेश साळुंखे, नामदेव मुंढे,आकाश राऊत, ईरशाद शेख, आविनाश रणखांब, माधव जोगळ, सतीश कांबळे सह रक्त पिढीतील अधिकारी कर्मचारी व रक्तदाते अन्य इतर उपस्थित होते.

# श्री मल्लिकार्जुन मंदिरात जलाभिषेक रुद्राभिषेक, मंत्रोच्चारांनी भक्तिमय वातावरण

अचलेर (प्रतिनिधी)– लोहारा तालुक्यातील अचलेर येथे भाविकांचे श्रद्धास्थान असलेले अचलेर गावचे ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन मंदिर आहे. अचलेर येथे प्रति श्रीशैल म्हणून ओळखले जाणारे श्री मल्लिकार्जुन मंदिराचे जुने हेमाडपंथी मंदिर आहे. मंदिरातील पींड ही दक्षिणमुखी असून हे मंदिर नीलगंगेच्या डोंगराच्या कुशीत वसलेले आहे. येथे मोठ्या प्रमाणात भाविक दर्शनासाठी येतात.

श्रावण महिना सुरू झाला असून, त्यानिमित्ताने मंदिरामध्ये भक्तांचा उत्साहपूर्ण सहभाग पाहायला मिळत आहे. पहाटेपासूनच या ठिकाणी मंदिरात रांगा लागतात. भक्तांनी जलाभिषेक, रुद्राभिषेक व मंत्रोच्चारांनी वातावरण भक्तिमय होते. श्रावण महिना हा भगवान शिवाला अत्यंत प्रिय मानला जातो. या महिन्यात सोमवारी व्रत ठेवणे, शिवलिंगावर जल व दुर्वा अर्पण करणे याला विशेष महत्त्व आहे.

या श्रावण महिन्यात नियमितपणे व सोमवारी श्री मल्लिकार्जुन मंदिर व बाजूलाच असलेल्या श्री बसवेश्वर मंदिरात भाविक मोठ्या श्रद्धेने दर्शन घेतात. मंदिर परिसर फुलांच्या सजावटीने सजवला जातो. पहाटे आरती व अभिषेकाने वातावरण मंत्रमुग्ध होते.

परिसरात बाळगोपाळ, ग्रामस्थ घेतात वनभोजन श्रावण महिन्यात सोमवारी श्री मल्लिकार्जुन मंदिर परिसरात असलेल्या हिरव्यागार वनात व मंदिरात अनेक भक्त, गावातील सर्व बाळगोपाळ, शाळेतील विद्यार्थी व ग्रामस्थ वनभोजनाचा आनंद घेतात. भक्तगण या मंदिरात महाप्रसादाचे आयोजन करतात. श्रावणातील या पवित्र सोमवारी भक्तांनी श्रद्धा, भक्ती आणि संयमाची जोड देत धार्मिकतेचे सुंदर दर्शन घडवून आणतात. गुढीपाडव्याला या मंदिराची पाच दिवस यात्रा भरते.

# सामाजिक उपक्रमाने गणेशोत्सव साजरा करा : लोहाऱ्यात मंडळांच्या बैठकीत उपविभागीय पोलिस अधिकारी शेलार



लोहारा(प्रतिनिधी)–गणेशोत्सव काळात विविध सामाजिक उपक्रम राबवून हा गणेशोत्सव शांततेत साजरा करा असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी सदाशिव शेलार यांनी केले.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर लोहारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या गणेश मंडळांची बैठक लोहारा पोलीस ठाण्यात मंगळवारी (दि.१२) आयोजित करण्यात आली होती. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी सदाशिव शेलार बोलत होते. पुढील काही दिवसांत गणेशोत्सव येत आहे. यानिमित्त लोहारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या गणेश मंडळांची बैठक लोहारा पोलीस ठाण्यात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीसाठी उपविभागीय पोलीस अधिकारी सदाशिव शेलार, पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर कुकलारे, लोहारा तहसिल कार्यालयातील नायब तहसीलदार ए. सी. अहिरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना सदाशिव शेलार म्हणाले की, गणेशोत्सव साजरा करताना प्रत्येक गणेश मंडळांनी आवश्यक ती काळजी घेऊन गणेशोत्सव शांततेत साजरा करावा. गणेशोत्सव काळात सामाजिक उपक्रम मोठ्या प्रमाणात राबवावेत. तसेच मिरवणुकीत पारंपारिक वाद्यांचा वापर करा, असे आवाहन यावेळी बोलताना केले.

या बैठकीसाठी भाजपाचे तालुकाध्यक्ष राजेंद्र पाटील, नगरसेवक जालिंदर कोकणे, दिपक मुळे, हरी लोखंडे, इकबाल मुल्ला, ओम पाटील, उत्तम भालेराव, पोलीस कर्मचारी माधव कोळी, आकाश भोसले यांच्यासह गणेश मंडळाचे पदाधिकारी, सदस्य, पोलीस पाटील उपस्थित होते. पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर कुकलारे यांनी आभार मानले.

# रहदारीस धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यांवर गुन्हे नोंद

भुम (प्रतिनिधी)– पोलीस ठाणे अंतर्गत धनाजी रा. बाजार रोड भुम ता. भुम जि. धाराशिव यांनी दि.१२.०८.२०२५ रोजी १०.३० वा. सु. आपल्या ताब्यातील एरटिका कार क्र एमएच २५ एएस ८१८० ही गोलाई चौक ते ओंकार चौक भुम येथे जाणारे सार्वजनिक रोडवर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना भुम पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम २८५ मोवाका अन्वये भुम पो.ठा. येथे गुन्हा नोंदवला आहे


## लातूर समाचार उस्मानाबाद
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708


## उस्मानाबाद शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६१२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२
Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649